SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीग्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला ▸ कापड बाजार, फोन नं. 7666510765 ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर. ▸ सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २५.०५.२०२६ | अंक नं. ०४६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अधिक मास
आता बनवा अधिक खास
खास धोंड्यानिमित्त जावाई व मुलीला वाण देण्यासाठी आकर्षक व वेगवेगळ्या वजनामधील चांदीची भांडी उपलब्ध.
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# प्रशिक्षणादरम्यान पोलीस मुख्यालयात ‘हँडग्रेनेड’चा स्फोट; चार जवान जखमी

नगर - येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरु असलेल्या प्रशिक्षणादरम्यान अत्यंत धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मॉक ड्रिल दरम्यान हाताळणीचे प्रशिक्षण दिले जात असताना एका हँडग्रेनेडचा हातातच भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.







२५ मे रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचाऱ्यांना हँडग्रेनेड कसा हाताळावा याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. त्याचवेळी अचानक हँडग्रेनेडचा हातातच स्फोट झाला.

या दुर्दैवी घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्या आहेत. तर इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनेनंतर पोलीस मुख्यालयात पळापळ आणि गोंधळ उडाला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी सांगितले की, हा स्फोट स्मोक हँडग्रेनेड फुटल्यामुळे झाला आहे. जमाव पांगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या ग्रेनेडची पिन काढल्यानंतर संबंधित जवानांकडून लिव्हर सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला.

# भारतीय शेअर बाजार सेन्सेक्स वधारला

## आरबीआयचा विक्रमी लाभांश, कच्च्या तेलातील घसरणीचा बाजाराला बुस्टर

मुंबई - भारतीय शेअर बाजारात आठवड्याच्या पहिल्याच सत्रात (दि.२५) मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक (सेन्सेक्स) १००० हून अधिक अंकांनी वधारून ७६,४०० च्या पार गेला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक (निफ्टी) ३०० अंकांनी वधारुन २४,००० च्या पार पोहोचला आहे. ७ मे नंतर प्रथमच निफ्टीने २४ हजारांचा टप्पा पार केला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने सरकारला तब्बल २.८७ लाख कोटी रुपयांचा ऐतिहासिक लाभांश देण्याची घोषणा केल्यामुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. त्यामुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक (सेन्सेक्स) १००० हून अधिक अंकांनी तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक (निफ्टी) ३०० हून अधिक अंकांनी वधारुन २४००० च्या पार पोहोचल्याचे दिसून आले.

# मागील दहा दिवसात ४ वेळा झाली पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ

मुंबई/नगर - पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मागील दहा दिवसांत ४ वेळा वाढ झाली आहे. २५ मे रोजी पुन्हा दरवाढ करण्यात आली. त्यामुळे पेट्रोल प्रति लिटर २.६१ ने, तर डिझेल २.७१ रुपयांने महागले. या दरवाढीमुळे मागील १० दिवसांत पेट्रोलच्या दरात एकूण ८ रुपये प्रति लिटर वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे अहिल्यानगरमध्ये पेट्रोल १११.५७ रुपये तर डिझेल ९८.२५ रुपये प्रति लीटरवर पोहोचले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत २५ मे रोजी घसरण झाली आहे. अमेरिका-इराण शांतता कराराच्या शक्यतेमुळे ब्रेंट क्रूड फ्युचर्स ४.५५ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ९८.८३ डॉलरवर आले आहे. ७ मेनंतरची ही सर्वात नीचांकी पातळी मानली जात आहे. मात्र, त्याचवेळी डॉलरच्या तुलनेत रुपयाचीही घसरण झाली आहे. त्यामुळे भारताचा आयात खर्च वाढला आहे. तसेच, पश्चिम आशियातील भू-राजकीय तणाव आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तेल वाहतुकीतील अडथळ्यांमुळे जागतिक तेल बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली आहे. परिणामी देशांतर्गत तेलांच्या किम्मतीत वाढ झाल्याचे तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपयांनी वाढ झाली होती. त्यानंतर १९ मे रोजी पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ९० पैशांची वाढ झाली. २३ मे रोजी पेट्रोल ८७ पैशांनी तर डिझेल ९१ पैशांनी महागले. आणि आज, २५ मे रोजी पेट्रोल २.६१ रुपयांनी आणि डिझेल २.७१ रुपयांनी महागले.

## पेट्रोल, डिझेलसोबत सीएनजीही महागले

पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीसोबतच सीएनजीच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. या भाववाढीनंतर २५ मे रोजी नगरमध्ये सीएनजीचे दर १०१.८४ रुपये प्रतिकिलोवर जावून पोहोचले आहेत. यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही महागणार असून, लोकांवर आर्थिक बोजा पडणार आहे.

सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे, शिकवण आम्हाला दिली अविरत सेवेची,
कर्तव्य आम्हाला शिकवले स्व:कष्टाचे, आदर्श आम्हाला दिले सद्‌विचारांचे...
आपली शिकवण हिच सोबती आमची जन्मजन्मांतरीची...



स्व. रावसाहेब (आण्णा) सिताराम बोरुडे
स्व. दि. २५/०५/२०२१
|| पाचवे पुण्यस्मरण ||
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण आदरांजली..
समस्त बोरुडे परिवार
अहिल्यानगर

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रँण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट, क्वाडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स, फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

महात्मा फुले जन आरोग्य योजना
सर्व रंगाच्या शिधापत्रिका धारकांना मिळणार योजनेचा लाभ
MJPJAY
फक्त लहान मुलांसाठी मोफत आंतररुग्ण सेवा
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी, अ.नगर येथे उपलब्ध आहे.
त्यासाठी लागणारे कागदपत्रे :
१) रेशन कार्ड सर्व रंगांचे २) आयुष्मान कार्ड कुटुंबातील व्यक्तिचे ३) आधारकार्ड रुग्णाचे.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
मो : 9511110444, 9881800444
डॉ. अनिरुद्ध गिते (MBBS, MD paeds)

ADMISSION OPEN
MAHA DISCOUNT
www.dishagroup.in
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE
COURSES
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD
CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN
C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION
ANY COURSE JUST IN 1800/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# 'ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर'च्या अध्यक्षपदी संपत बारस्कर यांची बिनविरोध निवड

### मुख्य विश्वस्तपदी इंजि. बबनराव कातोरे तर सचिवपदी डॉ. भूषण अनभुले यांची निवड





नगर - ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच मुख्य विश्वस्त प्रवर्तकपदी इंजिनिअर बबनराव कातोरे तर सचिवपदी डॉ. भूषण अनभुले यांची निवड करण्यात आली असून धर्मदाय उपायुक्त कार्यालय, अहिल्यानगर यांनी या निवडीस अधिकृत मंजुरी दिली आहे. संस्थेच्या मागील कार्यकारी मंडळाचा कार्यकाल संपल्यानंतर ९ मे रोजी संस्थेच्या आजीव सभासदांची सभा पार पडली. या सभेमध्ये संस्थेच्या घटनेतील कार्यकारी मंडळ निवडीच्या तरतुदीनुसार नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. त्यानंतर सदर बदल अर्ज धर्मदाय उपायुक्त कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्या अर्जास अखेर मंजुरी मिळाल्याची माहिती नूतन अध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिली.

या नव्या कार्यकारी मंडळामध्ये उपाध्यक्षपदी रावसाहेब सप्रे, खजिनदारपदी सुदाम भोर, विश्वस्त प्रवर्तक म्हणून प्रकाश गुगळे, शरद भोर, शांताराम गाडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्यकारी सदस्य म्हणून दिगंबर सप्रे, ॲड. विक्रम वाडेकर, प्रवीण कातोरे, क्रांतीकला अनभुले, भालचंद्र शिरोडे, भगवान हावरे आणि निर्मला मुळे यांची निवड करण्यात आली आहे.

निवडीनंतर बोलताना अध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण विकास मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण, शहरी तसेच एमआयडीसी परिसरातील कामगारांच्या मुलांना माफक फीमध्ये उत्तम शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. ते पुढे म्हणाले की, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर भर देत त्यांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. संस्था नावारूपाला आणण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने काम केले जाईल.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## वसतिगृहांसाठी सैनिकांच्या पाल्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू


नगर - जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर, श्रीगोंदा व कोपरगाव येथील सैनिकांच्या मुला-मुलींच्या वसतिगृहांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, ३० जून पर्यंत प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथे सैनिक मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह नगर कॉलेजसमोर स्थित असून, श्रीगोंदा येथे शासकीय आरोग्य केंद्राशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह कार्यरत आहे. तसेच कोपरगाव येथे खंडोबा मंदिराशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह सुरू आहे.

या वसतिगृहांमध्ये अंघोळीसाठी गरम पाणी, स्वतंत्र अभ्यासिका, विविध खेळांचे साहित्य तसेच सुसज्ज मैदान उपलब्ध आहे. वेळोवेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात येते. अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांच्या अधीक्षकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


या वसतिगृहांमध्ये इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर शिक्षण तसेच औद्योगिक प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिक व सेवेत असलेल्या सैनिकांच्या पाल्यांना सवलतीच्या दरात प्रवेश दिला जाणार आहे. युद्धविधवा तसेच दिव्यांग सैनिकांच्या पाल्यांना विनामूल्य प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार आहे. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी १ जुलै रोजी प्रवेश निश्चितीसाठी उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.

## सुरेश कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - महावीरनगर, सावेडी येथील रहिवासी सुरेश देवीचंद कोठारी (वय ७१) यांचे २३ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २४ मे रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे, २ भाऊ, भावजया, १ बहीण असा परिवार आहे. ॲड. प्रकाश व डॉ. पारस कोठारी यांचे ते बंधू होत.

## किरण खुर्जेकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष किरण उर्फ प्रमोद खुर्जेकर यांचे २४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. केडगाव ब्राह्मण सेवा संघाच्या स्थापनेपासून म्हणजेच सुमारे २७ ते २८ वर्षापासून संघाच्या सर्व उपक्रमाचे नेतृत्व त्यांनी केले होते. परशुराम प्रतिष्ठान अहिल्यानगर तसेच सकल ब्राह्मण महासंघ अहिल्यानगर आणि समर्थ परिवार अहिल्यानगर येथेही सक्रिय सभासद होते.

# नवीन एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग आणून अहिल्यानगरच्या युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार : आ. संग्राम जगताप

### प्रभाग क्रमांक दोनमध्ये सूर्यानगर ते सनी हॉटेल रस्ता व पुलाच्या कामाचे भूमिपूजन

नगर - शहरामध्ये नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामांची घोडदौड सुरू असून मुंबईच्या धर्तीवर दर्जेदार रस्ते निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुढील वीस वर्षांचा विचार करून शहरातील विकासकामे मार्गी लावली जात आहेत. नगरकरांनी दिलेल्या मतांच्या आशीर्वादामुळेच विकासकामांसाठी मोठा निधी आणणे शक्य झाले असून नागरिकांच्या सहकार्यामुळे शहराच्या प्रत्येक भागात विकासाची गंगा पोहोचत असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

प्रभाग क्रमांक दोन मधील सूर्यानगर ते सनी हॉटेलपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व पुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

यावेळी ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक महेश तवले, नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, माजी नगरसेविका रूपालीताई वारे, गोविंद वाघ, राजेंद्र बुधवंत, महादेव दानवे, राहुल सांगळे, संपत नलवडे, दत्तात्रेय गावडे, एकनाथ चेमटे, वैभव ढाकणे आदींसह नागरिक उपस्थित होते.



प्रभाग क्रमांक दोन मधील सूर्यानगर ते सनी हॉटेलपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व पुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया - लहू दळवी)

आमदार संग्राम जगताप पुढे म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून शिर्डी येथे डिफेन्स क्षेत्रातील मोठे युनिट उभारण्यात आले असून त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. पुढील वर्षापर्यंत अहिल्यानगरच्या नवीन एमआयडीसीमध्ये आणखी मोठा उद्योग आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून त्याचा थेट फायदा शहरातील युवकांना रोजगाराच्या स्वरूपात होणार आहे. विकासकामांसोबतच बाजारपेठांची आर्थिक उन्नती आणि युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीही काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सूर्यानगर परिसराला जोडणाऱ्या या मुख्य रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच या रस्त्यावरील पुलाचे कामही मार्गी लागल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरसेवक महेश तवले म्हणाले की, प्रभाग क्रमांक दोनमधील सूर्यानगर परिसराला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याचे काम मार्गी लागावे यासाठी आमदार जगताप यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मंजूर केले. तसेच या रस्त्यावरील पुलाच्या कामासाठीही निधी मिळाल्यामुळे नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. प्रभाग क्रमांक दोनमध्ये विविध विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने नागरिक समाधान व्यक्त करत असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी नगरसेवक बाळासाहेब पवार म्हणाले की, सूर्यानगर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर देवस्थानच्या वतीने ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांच्या मधुर वाणीतून श्रीराम कथाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. धार्मिक कार्यक्रमांमुळे सर्व जातीधर्मातील नागरिक एकत्र येत विचारांची देवाणघेवाण करतात. त्यामुळे विकासकामांसोबत धार्मिकतेचे महत्त्व समाजाला पटवून देण्याचे कामही केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सौ. विद्या बोरा यांचे संथारा व्रतात निधन



नगर - येथील सौ. विद्या बोरा (वय ६२) यांचे २४ मे रोजी सकाळी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नांतवंडे असा परिवार आहे. कांदा बटाटा व्यापारी दिलीप हस्तीमल बोरा यांच्या पत्नी, हर्षल बोरा व प्रांजल रोहन गांधी यांच्या माताश्री होत.

## उमी घडियाळी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - यशवंत कॉलनीतील रहिवासी उमी जाबीर घडियाळी (वय ७३) यांचे २४ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी बालिकाश्रम रोडवरील बोहरी कब्रस्तान येथे करण्यात आला. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अली अजगर घडीयाळी यांच्या त्या मातोश्री तर जे. एम. इलेक्ट्रीकल्स् व सकीना कलेक्शनचे जाबीर घडियाळी यांच्या त्या पत्नी होत.

## राजेंद्र दिकोंडा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सातभाई मळा, दिल्लीगेट येथील रहिवासी राजेंद्र (बाळू) बाबूराव दिकोंडा (वय ६६) यांचे २३ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २४ मे रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. अभिजीत दिकोंडा यांचे ते वडील होत.


## बालाजी मंचेवार यांचे दु:खद निधन



नगर - जालना येथील रहिवासी बालाजी गिरमाजी मंचेवार (वय ५६) यांचे २३ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जालना अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ भाऊ, २ मुले, पत्नी, सुना, नातू असा परिवार आहे. सागर, दयानंद, मंगेश यांचे ते बंधू तर अक्षय, रितीक यांचे वडील होत.

## सिताराम डावखर यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील गोंधवणी गावातील शेतकरी सिताराम माधवराव डावखर (वय ८०) यांचे २३ मे रोजी सायं.७:३० वा. वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. काका ट्रान्सपोर्टचे मालक मनोहर डावखर व संदिप डावखर यांचे वडील, माजी नगरसेवक अण्णासाहेब डावखर यांचे चुलत बंधू होत.

## केडगावमध्ये वृद्ध महिलेला लुटले; तोंड दाबून दात पाडला; गुन्हा दाखल

नगर - केडगाव परिसरातील वैष्णवनगर भागात तुळजा भवानी मंदिरासमोर एका वृद्ध महिलेला जबरदस्तीने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास घरात घुसून दोन अज्ञात चोरट्यांनी वृद्ध महिलेचे तोंड दाबून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम हिसकावून घेतली. या झटापटीत वृद्ध महिलेचा दात पडला असून, या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे माथाडी कामगार आहेत. २४ मे रोजी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास त्यांची ९४ वर्षीय वृद्ध आई लघुशंकेसाठी घराबाहेर आली होती. ती परत घरात जाऊन खाटेवर बसली असताना, दोन अज्ञात चोरट्यांनी घरात अनाधिकृतपणे प्रवेश केला. चोरट्यांनी वृद्ध महिलेचे तोंड दाबून धरले आणि तिच्या नाकातील पाच ग्रॅम वजनाची सोन्याची गोल नथ, गळ्यातील तीन ग्रॅम वजनाची सोन्याची पोत आणि ६०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण ३२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून घेतला. तोंड दाबल्यामुळे वृद्ध महिलेचा दात पडला असून ती जखमी झाली आहे. तिला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आणि इतर पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करत आहेत.

## भिस्तबाग नाक्याजवळ हवेत गोळीबार; तरुणावर प्राणघातक हल्ला; गुन्हा दाखल

नगर- शहरातील पाईपलाईन रोडवरील भिस्तबाग नाक्याजवळ पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या हल्लयादरम्यान आरोपींनी परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी हवेत गोळीबार केल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिरंजीव दत्तात्रय गाढवे (वय ३१, रा. गणेश नगर, बोल्हेगाव) हे पाईपलाईन रोडवरील भिस्ते बाग नाक्याजवळ आले असता, तोंडाला मास्क लावलेले तीन ते चार अज्ञात तरुण अचानक त्या ठिकाणी आले. 'तुम्ही पप्पू शेठ आणि गौरव यांच्यावर गुन्हा का दाखल केला?' असा जाब विचारत या अज्ञात आरोपींनी चिरंजीव गाढवे यांच्यावर थेट हल्ला चढवला. एका आरोपीने लोखंडी वस्तूने त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर जबर मारहाण केली, तर दुसऱ्या आरोपीने धारदार शस्त्राने त्यांच्या पाठीवर वार करून गंभीर जखमी केले.

हल्ला सुरू असतानाच तिसऱ्या अज्ञात आरोपीने कमरेचे पिस्तूल बाहेर काढले. आरोपीच्या हातात पिस्तूल पाहताच स्वतःचा जीव वाचवण्यासाठी फिर्यादी चिरंजीव गाढवे यांनी तात्काळ जवळच असलेल्या एका चहाच्या दुकानात धाव घेतली आणि तेथील फ्रीजच्या मागे लपून बसले. संतापलेल्या आरोपींनी दुकानाच्या बाहेरूनच हवेत गोळीबार केला आणि परिसरात दहशत पसरवून सर्व आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. या थरारक हल्लयानंतर जखमी चिरंजीव यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रुग्णालयात मिळालेल्या जबाबानुसार तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि हत्यार कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे.

# शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर मंत्रालयात जावून राज्यभरातील शेतकरी महसूलमंत्र्यांना देणार निवेदन

नगर - राज्यातील शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने १ व २ जून रोजी चलो मंत्रालयचा नारा दिला आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील पदाधिकारी व शेतकरी मंत्रालयात जाऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच संबंधित विभागांकडे पुराव्यासह निवेदने सादर करणार आहेत.

शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून ग्राम, तालुका, जिल्हास्तरापासून मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करून शेतरस्त्यांसंदर्भात विविध महत्त्वपूर्ण शासननिर्णय मंजूर करण्यात यश मिळाले आहे. मात्र, काही भागांमध्ये अधिकारी शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करत असताना अनेक ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांना अजूनही हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप पवळे यांनी केला आहे.राज्यात शिव पाणंद प्रकरणांसाठी झिरो पेंडन्सी अभियान राबवावे, तालुका, जिल्हा व मंत्रालय स्तरावर मासिक बैठकांचे आयोजन करावे, सर्व शेतरस्त्यांची नोंद घेऊन दगडी नंबरीद्वारे हद्द निश्चित करावी, तसेच सातत्याने सर्वेक्षण करून रस्त्यांचे मजबुतीकरण करावे, अशी मागणी चळवळीने केली आहे.

तसेच तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेली शेतरस्त्यांची प्रकरणे विशेष बाब म्हणून तातडीने निकाली काढावीत, शेतरस्त्याअभावी पडीत राहणाऱ्या जमिनींसाठी संबंधित जबाबदारांकडून नुकसानभरपाई द्यावी, क्षेत्रीय समित्यांमध्ये चळवळीच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व द्यावे, तसेच सर्व कार्यालयांमधील अहवाल सार्वजनिकपणे प्रदर्शित करावेत, अशाही मागण्या करण्यात आल्या आहेत.

तहसीलदार कार्यालयातील अर्जांवर उत्तर देणे बंधनकारक करावे, प्रलंबित किंवा त्रुटी असलेले अर्ज तातडीने दुरुस्त करावेत, तहसीलदारांच्या आदेशांचे प्रांत व जिल्हाधिकारी स्तरावर अंतिम सर्वेक्षण करून अपील प्रक्रिया सुलभ करावी, तसेच न्यायालयीन प्रकरणे महसूल विभागाकडे वर्ग करून फास्ट ट्रॅक पद्धतीने निकाली काढावीत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

शिव पाणंद शेतरस्त्यांसाठी मंत्रालयासह तालुका व जिल्हा स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची मागणी करत राज्य सरकारने प्रशासकीय कार्यालयांतील शेतरस्त्यांच्या कामकाजाचा अहवाल जाहीर करावा, अशी अपेक्षाही शरद पवळे यांनी व्यक्त केली आहे.

## उपोषणाचा राग मनात धरून एकाला मारहाण

नगर - उपोषणाला बसू नको, असे म्हणून चौघांनी एका ५६ वर्षीय व्यक्तीला अडवून शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना पिंपळगाव माळवी शिवारात घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाऊसाहेब दशरथ काळे (वय ५६, रा. उंबरे, ता. राहुरी) यांनी याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुनील आप्पासाहेब दुर्सिंग, अनिल सुखदेव दुर्सिंग, बबलू राजेंद्र ढोकणे आणि प्रवीण भास्कर शिरसाठ (सर्व रा. उंबरे, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी भाऊसाहेब काळे हे आपल्या दुचाकीवरून वांबोरी रस्त्याने अहिल्यानगरकडे जात होते. ते पिंपळगाव माळवी गावच्या शिवारात आले असता, आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले. 'तू उपोषणाला बसू नको' असे म्हणून त्यांनी काळे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावर काळे यांनी 'मी तुमच्याविरुद्ध उपोषणाला बसणारच आहे' असे उत्तर दिले. याचा तीव्र राग मनात धरून सुनील दुर्सिंग याने हातातील एका टनक वस्तूने काळे यांच्या उजव्या गालावर मारून त्यांना जखमी केले. तसेच 'जर तू उपोषणाला बसला तर तुला जीवे मारून टाकू' अशी धमकी दिली. आरोपींनी फिर्यादीचा भ्रमणध्वनी हिसकावून जमिनीवर फेकून दिला आणि त्याचे नुकसान केले. या घटनेनंतर काळे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पुढील तपास साहाय्यक फौजदार महंमद शेख करत आहेत.

## शेजाऱ्यानेच विश्वासघात करत लग्नकार्यासाठी नेलेले पाच लाखांचे सोन्याचे दागिने हडपले

नगर - लग्नकार्यात घालण्यासाठी शेजाऱ्याकडून विश्वासाने नेलेले लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने परत न करता, त्याचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार नागापूर परिसरातील पितळे कॉलनी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका महिलेने तिच्या घराशेजारी पूर्वी राहणाऱ्या एका ओळखीच्या महिलेवर विश्वास ठेवला होता. संबंधित आरोपी महिलेने लग्नकार्यात घालण्यासाठी दागिने हवे असल्याचे सांगून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिने सुमारे २ लाख ८० हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची पोत, १ लाख ४० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले फुल आणि वेल, तसेच ७० हजार रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची ठुसी असे एकूण ४ लाख ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने उसने नेले होते.

हे दागिने घेतल्यानंतर आरोपी महिलेने ते परत न करता सोन्याचा अपहार केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार नोंदवली आहे. पोलिसांनी या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२) प्रमाणे विश्वासघात आणि अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### एसी मध्ये बसत असाल तर...

आजच्या आधुनिक युगात एसी ही गरज बनली आहे. ऑफिस, घर, गाडी सगळीकडे आपण तासन्तास एसी च्या थंड हवेत बसतो. उन्हापासून आराम मिळतो हे खरे, पण त्याचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात याची जाणीव फार कमी लोकांना असते. एसी ची हवा नैसर्गिक नसते. ती खोलीतील आर्द्रता सतत शोषून घेते, त्यामुळे त्वचा, डोळे, नाक कोरडे पडू लागते. सतत एकाच तापमानात बसल्याने शरीराची नैसर्गिक तापमान नियंत्रित करण्याची क्षमता हळूहळू कमी होते. बाहेरच्या गरम वातावरणात गेल्यावर शरीराला जुळवून घेता येत नाही आणि लगेच सर्दी, ताप, डोकेदुखी सुरू होते. शिवाय एसी चे फिल्टर वेळेवर साफ केले नाहीत तर त्यात साचलेली धूळ, बुरशी आणि जिवाणू थेट आपल्या श्वासात जातात. यामुळे दमा, सायनस, ॲलर्जी यांसारखे श्वसनाचे आजार बळावतात. थंड हवेमुळे स्नायू ताठरतात, त्याचा थेट परिणाम मानदुखी, पाठदुखी आणि सांधेदुखीवर होतो. पचनक्रियाही मंदावते, त्यामुळे ॲसिडिटी आणि गॅसचा त्रास वाढतो. सूर्यप्रकाशाचा संपर्क तुटल्याने शरीरात व्हिटॅमिन डी तयार होत नाही, ज्यामुळे हाडे कमकुवत होतात आणि थकवा वाढतो. थोडक्यात, उ चा अतिवापर आरामदायी वाटला तरी तो हळूहळू शरीराला आतून कमकुवत करत नेतो. म्हणूनच एसी वापरणे टाळता येत नसेल तरी त्याचे नियम पाळणे गरजेचे आहे.

## पाककला

### रसगुल्ला शॉटस्

**साहित्य :** रसगुल्ला शॉट्स बनवण्यासाठी आपल्याला लागेल दहा ते बारा छोटे रसगुल्ले, अर्धा लिटर फुल क्रीम दूध, पाव वाटी साखर, चार-पाच केशराच्या काड्या, पाव चमचा वेलची पूड, दहा-बारा बदाम व पिस्त्याचे काप, आणि सजावटीसाठी गुलाबाच्या पाकळ्या. हवे असल्यास वरून टाकण्यासाठी थोडे रोझ सिरप किंवा रुहअफजा घेऊ शकतो.

**कृती :** सर्वात आधी अर्धा लिटर दूध जाड बुडाच्या भांड्यात मंद आचेवर आटवायला ठेवावे. दूध निम्मे होईपर्यंत सतत ढवळत राहावे म्हणजे खाली लागणार नाही. दूध आटल्यावर त्यात साखर, केशराच्या काड्या आणि वेलची पूड टाकून दोन मिनिटे उकळावे आणि गॅस बंद करून हे आटवलेले दूध म्हणजेच रबडी पूर्णपणे थंड करायला ठेवावी. रबडी थंड होईपर्यंत रसगुल्ले हलक्या हाताने दाबून त्यातला जास्तीचा पाक काढून टाकावा. आता सर्व्ह करताना छोटे छोटे शॉट ग्लास घ्यावेत. प्रत्येक ग्लासमध्ये आधी एक रसगुल्ला ठेवावा, त्यावर दोन ते तीन चमचे थंडगार रबडी ओतावी. वरून बदाम-पिस्त्याचे काप, केशराची एक काडी आणि हवे तर थोडे रोझ सिरप टाकावे. शेवटी गुलाबाच्या पाकळीने सजवून रसगुल्ला शॉट्स फ्रिजमध्ये अर्धा तास थंड करून सर्व्ह करावे. हे शॉट्स तोंडात टाकल्यावर एकदम रसगुल्लयाचा मऊपणा आणि रबडीची मलाई दोन्ही एकत्र लागते.

## वास्तू

### नकारात्मक ऊर्जा टाळा

* तुटलेल्या वस्तू, बंद पडलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे, जुने पेपर घरात साठवून ठेवू नयेत कारण त्यातून नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

* घरात रोज सकाळी गोमूत्र किंवा मिठाचे पाणी शिंपडावे आणि कापूर जाळावा, यामुळे वातावरण शुद्ध होते.

* उत्तर दिशेला तिजोरी किंवा पैसे ठेवण्याचे कपाट असावे आणि त्याचे तोंड उत्तर दिशेला उघडेल असे ठेवावे, याने धनवृद्धी होते.

## सौंदर्य

* भुवया रंगवण्यासाठी मेहंदी किंवा कॉफी पावडर वापरू शकता, केमिकल डाय टाळावा.

* आठवड्यातून एकदा भुवया ब्रशने विंचराव्यात आणि खोबरेल तेलाने मसाज करावा, यामुळे रक्ताभिसरण वाढून भुवया दाट व काळ्याभोर होतात.

## सल्ला

स्वयंपाकघरातील झुरळे घालवण्यासाठी कडुनिंबाचा पाला किंवा तेजपान कपाटात ठेवावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २६ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, हस्त २९।५७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामात यश मिळेल. रागावर नियंत्रण ठेवा. अचानक धनलाभाचे योग.

**वृषभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण. खर्च वाढेल पण गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**मिथुन :** बोलताना जपून बोला. नवीन ओळखी होतील. प्रवासात काळजी घ्या.

**कर्क :** मनासारखी घटना घडेल. नोकरीत वरिष्ठ खूश होतील. आरोग्य उत्तम.

**सिंह :** आत्मविश्वासाने काम करा. स्पर्धेत जिंकाल. घरासाठी खरेदी होईल.

**कन्या :** कामाचा व्याप वाढेल. जोडीदाराची साथ मिळेल. पैसे जपून वापरा.

**तूळ :** व्यवसायात नफा होईल. मित्र भेटतील. मौजमजेत दिवस जाईल.

**वृश्चिक :** वादविवाद टाळा. कायदेशीर काम पुढे ढकला. तब्येत सांभाळा.

**धनु :** नशिबाची साथ आहे. रखडलेली कामे होतील. प्रवासाचे योग.

**मकर :** आर्थिक फायदा होईल. घरात शुभकार्य घडेल. थकवा जाणवेल.

**कुंभ :** नवीन संधी मिळेल. विद्यार्थ्यांना चांगली बातमी. कल्पनाशक्ती वाढेल.

**मीन :** भावनांवर ताबा ठेवा. व्यवहारात फसवणूक टाळा. देवदर्शन घडेल.

# शब्दगंध क्र. ७४३७

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | | |
| १० | | ११ | | ■ | १२ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | १३ | | ■ | १४ |
| १५ | १६ | | १७ | ■ | १८ | | |
| १९ | | ■ | २० | २१ | | ■ | |
| ■ | २२ | २३ | ■ | | ■ | २४ | ■ |
| २५ | | | ■ | २६ | | | |

**आडवे शब्द :-** १) बाहेर रस्त्यावर फिरण्यास पोलिसांकडून करण्यात आलेली मनाई ५) ओळख; वशिला ७) हाताची वेंध; आटोका; ताकत; पत ८) लता मंगेशकर यांना मिळालेली उपाधी १०) सप्त पातालांपैकी एक १२) एक भाषा १३) आंब्याचे बी; बाठा १५) परवानगी; मुभा; अनुमोदन; मान्यता १८) एक वेल व तिचे फूल; खिरीत घालण्याचा गव्हल्यासारखा एक पदार्थ १९) धागा; तंतू; दोरा २०) सारखा; बरोबर; पंचप्राणांपैकी एक २२) बिनथाटामाटाचा; अनलंकृत २५) सुवर्ण; कांचन; सोने २६) इतर; बाकीचे; गौण

**उभे शब्द :-** १) साथ; सोबत; सह २) एक हिंदी चित्रपट अभिनेत्री - जुही +++; भारताची दिवंगत अंतराळ कन्या कल्पना +++ ३) एक प्रांत ४) गरीब; रंक ५) वकिलाचा व्यवसाय; वकालत ६) मानेची पुढील बाजू; कंठ; घसा ९) रागावलेला ११) फार बारीक व मऊ १४) चिन्ह; गुणधर्म १५) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी १६) हानी; तोटा १७) एक समसंख्या; एका महिन्यातील सरासरी दिवस २१) माणूस; मनुष्य २३) वचक; दरारा; जरब २४) किरकोळ नसलेले; घाऊक

### शब्दगंध क्र. ७४३६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | मु | दा | यि | क | ■ | आ | ब |
| प | नी | र | ■ | फ | ट | क | ळ |
| ■ | म | वा | ली | ■ | र | स | द |
| अं | ■ | न | ख | ■ | फ | ■ | ■ |
| त | प | ■ | ■ | सो | ल | ■ | प |
| र | ■ | सा | मी | ल | ■ | व | य |
| पा | ल | म | ■ | क | र | त | ल |
| ट | ■ | ना | द | र | ■ | न | ट |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जे मिळाले त्यात समाधानी रहा, पण चांगल्यासाठी प्रयत्न सोडू नका.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वीज आधी चमकते आणि आवाज नंतर का येतो?

वीज चमकणे आणि गडगडाट होणे या दोन्ही घटना एकाच वेळी घडतात.जेव्हा ढगांमध्ये पॉझिटिव्ह चार्ज आणि निगेटिव्ह चार्ज एकमेकांवर आदळतात तेव्हा लायटनिंग तयार होते. या लायटनिंगच्या मार्गातील हवा एकदम ३०,००० डिग्री सेल्सिअस पर्यंत गरम होते.इतक्या प्रचंड हीटमुळे हवा एकदम एक्सपांड होते आणि मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज तयार होतो. यालाच आपण थंडर म्हणतो. म्हणजे लाईट आणि साऊंड एकाच क्षणी जन्म घेतात.पण आपल्यापर्यंत पोहोचण्याच्या स्पीडमध्ये जमीन-अस्मानाचा फरक असतो.लाईटचा स्पीड हा युनिव्हर्समधला सगळ्यात जास्त स्पीड आहे. व्हॅक्यूममध्ये लाईटचा स्पीड ३ लाख किलोमीटर प्रति सेकंद म्हणजे ३÷१०८ मीटर/सेकंद असतो. हवेतही लाईट जवळपास एवढ्याच स्पीडने ट्रॅव्हल करतो.त्यामुळे वीज चमकली की ती आपल्याला लगेच दिसते, डिले लागतच नाही.

याउलट साऊंड वेव्हजना ट्रॅव्हल करायला मीडियम लागते, जसे हवा, पाणी किंवा सॉलिड. हवेत २० डिग्री सेल्सिअस टेम्परेचरला साऊंडचा स्पीड फक्त ३४३ मीटर प्रति सेकंद असतो.म्हणजे लाईट हा साऊंडपेक्षा ८ लाख ७४ हजार पट जास्त वेगवान आहे.त्यामुळे साऊंडला आपल्यापर्यंत यायला वेळ लागतो आणि तो नंतर ऐकू येतो. एक सोपे एक्झाम्पल घेऊ. समजा वीज तुमच्यापासून ३ किलोमीटर लांब पडली.लाईटला ३ किमी अंतर कापायला ०.००००१ सेकंद लागतील, जे आपल्याला जाणवतही नाही. पण साऊंडला ३००० मीटर जायला ३००० भागिले ३४३ म्हणजे ८.७ सेकंद लागतील.म्हणून आधी चमक दिसते आणि जवळपास ९ सेकंदांनी गडगडाट ऐकू येतो. याच प्रिन्सिपलचा वापर करून वीज किती लांब आहे ते काढता येते.वीज चमकल्यावर लगेच वन, टू, थ्री असे सेकंद मोजायला सुरुवात करा.आवाज येईपर्यंत जितके सेकंद मोजले त्याला ३ ने डिव्हाइड करा.जे उत्तर येईल तेवढे किलोमीटर अंतरावर वीज पडली आहे.कारण साऊंड ३ सेकंदात १ किलोमीटर जातो. जर १२ सेकंदांनी आवाज आला तर वीज ४ किमी लांब आहे असे समजा.पावसाळ्यात स्टॉर्ममध्ये हा एक्सपेरिमेंट करून बघता येतो.आता थंडर आणि लायटनिंगमध्ये अंतर का वाटते ते कळले.लायटनिंग आधी दिसते कारण लाईट वेव्हज इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्हज असतात.त्यांना ट्रॅव्हल करायला हवेची गरज नसते आणि स्पीड खूप जास्त असतो.थंडर नंतर ऐकू येतो कारण साऊंड वेव्हज या मेकॅनिकल वेव्हज आहेत.त्यांना हवेच्या कणांना व्हायब्रेट करावे लागते, म्हणून स्पीड कमी असतो.

टेम्परेचर वाढले तर साऊंडचा स्पीड थोडा वाढतो, पण तरीही लाईटच्या तुलनेत खूपच कमी असतो.म्हणून कितीही गरम हवा असली तरी आधी वीज दिसणार आणि मगच आवाज येणार.व्हॅक्यूम म्हणजे हवेविरहित जागेत साऊंड ट्रॅव्हल करूच शकत नाही.पण स्पेसमध्ये सुद्धा सूर्याचा लाईट आपल्यापर्यंत येतो कारण त्याला मीडियम लागत नाही.म्हणूनच अंतराळात एक्सप्लोजन झाले तरी आवाज येत नाही, फक्त प्रकाश दिसतो.वीज आणि गडगडाटाचे सायन्स हेच आहे.

### दोन बी आणि एक शेतकरी


एकदा एका गावात राघू नावाचा गरीब शेतकरी राहत होता. त्याच्याकडे फक्त एक छोटासा तुकडा शेत होते. एके दिवशी त्याला वाटेत दोन बी सापडले. एक बी सोनेरी रंगाचे होते आणि दुसरे साधे तपकिरी. एक म्हातारा वाटसरू त्याला म्हणाला, हे दोन्ही जादूचे बी आहेत. सोनेरी बी पेरलेस तर एका रात्रीत सोन्याचे झाड उगवेल. पण तपकिरी बी पेरलेस तर तुला रोज मेहनत करावी लागेल, मग काही महिन्यांनी साधे धान्याचे पीक येईल.

राघूला लगेच श्रीमंत होण्याची हौस आली. त्याने विचार केला, कशाला महिने वाट बघू? एका रात्रीत श्रीमंत झालेलं बरं. त्याने सोनेरी बी आपल्या शेताच्या मधोमध पेरले आणि रात्रभर झोप न येता वाट बघत बसला. सकाळ झाली, पण शेतात काहीच उगवले नाही. त्याने रागाने बी उकरून बघितले तर ते आतून पोकळ निघाले. निराश होऊन राघूने दुसरे तपकिरी बी पेरले. रोज पहाटे उठून तो शेताला पाणी घालू लागला, तण काढू लागला, खते घालू लागला. हळूहळू त्या बीला अंकुर फुटला.

तीन महिन्यांनी शेतात छान गव्हाचे पीक डोलू लागले. ते पीक विकून राघूला चांगले पैसे मिळाले. पुढच्या वर्षी त्याने त्याच बियाणापासून पुन्हा शेत पेरले. असे करता काही वर्षांत राघू गावातला सगळ्यात सुखी शेतकरी झाला. एक दिवस तोच म्हातारा वाटसरू पुन्हा भेटला.

राघू म्हणाला, तुम्ही खोटे बोललात, सोनेरी बी तर पोकळ निघाले. म्हातारा हसला आणि म्हणाला, बाळा, मी खरंच बोललो होतो. सोनेरी बी हे 'आळस' होते आणि तपकिरी बी म्हणजे 'कष्ट'. आळस एका रात्रीत श्रीमंत करण्याचे स्वप्न दाखवतो, पण हातात काहीच देत नाही. कष्ट मात्र उशिरा का होईना, पण नक्की फळ देतात.

तात्पर्य : शॉर्टकटने मिळालेलं यश टिकत नाही. कष्ट, चिकाटी आणि संयम यातूनच खरं यश आणि समाधान मिळतं.



## जीवन का अमृत (भाग १)

### उनकी कृपा से तरक्की

जब आप बिस्तर पर पड़े हो, तो मन ही मन पवित्र सिद्ध नामों का जाप करें, अपनी आंतारिक दृष्टि को दिव्य-चक्षु पर टिकाएँ और सत्गुरु को प्रेम से याद करें। इसके अलावा, बिस्तर पर लेटे-लेटे आप पवित्र शब्द धुन को भी सुनने की कोशिश करें, जो कि दायीं ओर से आती हो । इन सबसे आपको असाधारण साहस और सहनशक्ति का वरदान मिलेगा, जिससे आप शारीरिक दर्द और मानसिक तनाव को सहन कर पाएँगे । मै पंजाब में अलग-अलग जगह के दौरे पर गया हुआ था। इस बार ३०० से ऊपर लोगों कों नामदान मिला और सभी को आश्चर्यजनक अनुभव हुए।

मुझे खुशी है कि आप तरक्की कर रहे हैं। सत्गुरु सदा आपके साथ हैं, हर कदम पर मार्गदर्शन करता हुआ और सहायता देता हुआ। यदि आप अंतर में जाएँ और सत्गुरु से अंतर में मिलें, तो वह आपसे बातें करेगा और आप बहुत खुश होंगे। मैं आपकी तीव्र उन्नति की कामना करता हूँ। कृपया अपने अभ्यासों में नियमित रहें, आप तरक्की करेंगे।

७१. हर कोई एक बेशकीमत व्यक्ति है और उसे अपना ईनाम मिलना ही चाहिए। हर एक में महान संभावनाएँ छुपी हैं, जिनका विकास किया जा सकता है, सत्गुरु की दया के सही प्रयोग से । सत्गुरु ने अपने बच्चों को, उनके प्रति प्रेम और दयाभाव के कारण, पवित्र शब्द की भेंट दे दी है और अगर प्रिय बच्चे, सत्गुरु का कहना मानना सीख जाएँ, तो वे अपना भला कर सकेंगे और संसार में सच्चे सुख-शांति के अधिकारी बनेंगे। सत्गुरु का हर वचन अमृत के समान है, जो मन के सभी विकारों को धो देता है। जो शिष्य श्रद्धा और विश्वास के साथ सिमरन करता है, उसका जीवन दिव्य प्रकाश से भर जाता है। नियमित अभ्यास से मन की चंचलता समाप्त होती है और अंतर में शांति का अनुभव होता है। जब जीव सत्गुरु की आज्ञा में रहकर भजन-सुमिरन करता है, तो काल भी उसका कुछ बिगाड़ नहीं सकता। सच्चे नाम की कमाई ही परलोक का असली धन है, जो सदा साथ निभाता है। इसलिए हे प्रिय आत्माओं, समय को व्यर्थ न गँवाकर हर श्वास में नाम का चिंतन करो। सत्गुरु का प्रेम ही सबसे बड़ा सहारा है, जो हर मुश्किल घड़ी में थाम लेता है। जिसने सत्गुरु को हृदय में बसा लिया, उसने वास्तव में परमात्मा को पा लिया।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### कुटुंब प्रमुख

भूमिकेच्या स्मृतीपासून आत्मिक स्मृतीकडे

सुरेश ओबेरॉय : आत्मा हाच इंद्रियांचा स्वामी, मालक आहे तर इंद्रियांना नियंत्रणात ठेवणं आपल्याला अवघड का वाटतं ?

शिवानीदीदी : जर मालकाला आपल्या स्थानाचा विसर पडला किंवा त्याला त्याच्या पदाचं भान नसेल तर कोणीच त्याचं ऐकणार नाही. आपल्या आजच्या संकटाचं मूळ स्वत:ची खरी ओळख नसण्यात आहे. मी कोण आहे? याचं उत्तर आपल्याकडे नाहीये. आपली खरी ओळख आणि स्वभाव यांबाबत आपण सजग असू तरच आपण शांती, प्रेम आणि शुद्धता या गुणांचा अनुभव घेऊ शकू. मी कोण आहे? या प्रश्नाला प्रतिसाद देताना आपण जे खोटं उत्तर देतो तेव्हा आपण आपल्या मूळ गुणांपासून लांब जातो. समजा, घरात तुम्ही कुटुंबप्रमुख आहात आणि ऑफिसमध्ये तुमच्या संस्थेचे कार्यवाह आहात. जर कोणी तुमचं ऐकलं नाही किंवा तुमच्याशी उद्धटपणाने वागलं तर तुम्ही दुखावले जाल आणि अस्वस्थ व्हाल. आणि हे खूप स्वाभाविकच आहे असं तुम्हाला वाटेल.

सुरेश ओबेरॉय :

दुखावलं जाणं स्वाभाविक नाहीये ?

शिवानीदीदी : ह्यावर आपण नंतर बोलू. जेव्हा तुम्ही दुखावले जाता तेव्हा तुम्ही स्वतःशी काय बोलता?

सुरेश ओबेरॉय : मी इथला वरिष्ठ आहे, ते माझ्याशी असे कसे वागू शकतात ?

शिवानीदीदी : जसा विचार तुम्ही निर्माण करता तशा भावना तयार होतात. ह्या परिस्थितीत, मी कोण आहे? या प्रश्नाला तुमचा प्रतिसाद

आहे, मी सासरा आहे, मी कुटुंबप्रमुख आहे, असा होता.

सुरेश ओबेरॉय : पण हे सगळं 'मी' आहे.

मी वडील

शिवानीदीदी : जर तुम्ही वडील आहात, तर तुमच्या मुलाने तुमच्याशी कसं बोललं पाहिजे ?

सुरेश ओबेरॉय : आदरपूर्वक.

शिवानीदीदी : मुलाने वडिलांशी आदरपूर्वक वागलं पाहिजे असा विचार करण्यासाठी तुम्ही तुमच्या मनाला प्रोग्रॅम केलं आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**पिंट्या :** आई, मी मोठा झाल्यावर शास्त्रज्ञ होणार.
**आई :** शाब्बास बाळा! मग काय शोध लावणार?
**पिंट्या :** होमवर्क न करता पास होण्याचं यंत्र.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रक्तदाब मोजण्याच्या यंत्राला काय म्हणतात?

- स्फिग्मोमॅनोमीटर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कांदा

१७) उन्हाळ्यात उन्हापासून त्रास कमी व्हावा म्हणून बाहेर पडताना डोक्यावर कांद्याच्या ताज्या पाकळ्या ठेवून त्यावर किंचित ओलसर स्कार्फ बांधून बाहेर पडावे. यामुळे शीतलता प्राप्त होऊन उन्हाचा त्रास कमी होतो.

१८) जखमेवर कांदा ठेचून त्याचा रस व पाकळी लावल्यास जखम त्वरित भरून निघते. कांद्याबरोबर गूळ मिसळून मुलांना खायला दिल्यास त्यांची वाढ लवकर होऊन उंची वाढते.

१९) त्वचा सुंदर होण्यासाठी तिळाच्या तेलात कांद्याचा रस घालून उकळून ते तेल नियमितपणे त्वचेवर लावावे.

२०) कांद्याच्या औषधी म्हणून उपयोग करताना त्याचा रस काढून तो हवाबंद बाटलीत ठेवावा व उन्हातून आल्यानंतर किंवा मधुमेहामुळे तळहात व पायांची आग होत असेल, तर तो रस लावावा. यामुळे उष्णतेचा त्रास कमी होऊन आग कमी होते.

२१) कच्चा कांदा खाल्ल्याने तोंडातील चिकटपणा नाहीसा होतो. तोंड व दात स्वच्छ करण्याचे काम कांदा करतो. तसेच कांदा खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते.

२२) जिरे आणि सैंधव घालून कांद्याची कोशिंबीर करून खाल्ली असता घशामध्ये साचलेला कफ नाहीसा होऊन घसा स्वच्छ होतो आणि पोटातील विषारी घटक शौचावाटे बाहेर पडतात.

२३) कांद्याचा कल्क करून तो पाण्यात उकळवून काढा करावा. हा काढा दोन चमचे घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा मध घालावा व हे मिश्रण प्यायल्यास रात्री चांगली झोप लागते.

सावधानता :

कांदा कापल्यानंतर त्याचा लगेचच वापर करावा. जास्त वेळ कापून ठेवलेला कांदा खाऊ नये. तसेच कांदा खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येऊ नये म्हणून आल्याचा तुकडा, लवंग चघळावी किंवा थोडा ओवा, बडीशेप खावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद गौरव राऊत यांना महिंद्रा कंपनीच्या थार वाहनाचे कर्जरूपी वितरण करण्यात आले.

# पवन नागरी पतसंस्थेकडून सभासदाला थार गाडीचे कर्जवाटप

**सभासदांच्या प्रगतीसाठी पतसंस्था कायम कटिबद्ध : व्हाईस चेअरमन आशा चौरे यांचे प्रतिपादन**

नगर – पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद गौरव राऊत यांना महिंद्रा कंपनीच्या चारचाकी थार वाहनाचे कर्जरूपी वितरण करण्यात आले. संस्थेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला पदाधिकारी, संचालक, सभासद आणि नागरिकांची उपस्थिती होती. वाहन वितरणानंतर सभासद गौरव राऊत यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी चेअरमन किरण धारक, व्हाईस चेअरमन आशा चौरे, संचालक बाळासाहेब हुचे, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरिया, मनोज क्षीरसागर, दीपक भागवत, अभय काळे, जालिंदर चौरे, सागर डोळसे, ॲड. अमित राशिनकर, ॲड. संदीप पडोळे, मधुरा जोशी, नंदकुमार गुरसाळे, सागर सातपुते, व्यंकटेश जोशी, कविता डोळसे, मृणाल तिवारी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांच्या हस्ते वाहनाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सभासद गौरव राऊत यांना वाहनाची चावी सुपूर्द करण्यात आली.

व्हाईस चेअरमन आशा चौरे म्हणाल्या, सभासदांचा विश्वास हीच पतसंस्थेची सर्वात मोठी ताकद आहे. प्रत्येक सभासद आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, त्याच्या गरजा वेळेत पूर्ण व्हाव्यात यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. केवळ कर्जपुरवठा न करता सभासदांच्या प्रगतीचा भागीदार होण्याची भूमिका संस्था पार पाडत आहे. आज अनेक कुटुंबे व्यवसाय, शेती आणि उद्योगासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून पुढे येत आहेत. सभासदांच्या स्वप्नांना गती देण्याचे काम पवन नागरी पतसंस्था करत असून भविष्यात आणखी आकर्षक योजना राबवून सभासदांना अधिक सक्षम करण्याचा मानस आहे

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की सहकार क्षेत्र हे ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिक विकासाचे प्रभावी माध्यम आहे. सभासदांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास ही आमच्यासाठी प्रेरणा आहे. पारदर्शक व्यवहार, तत्पर सेवा आणि विश्वासार्हता यामुळे पवन नागरी पतसंस्था अल्पावधीत नागरिकांच्या पसंतीस उतरली आहे. पुढील काळात युवक, महिला आणि लघुउद्योजकांसाठी विशेष योजना राबविण्याचा संस्थेचा प्रयत्न राहील.

चेअरमन किरण धारक यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सभासदांची प्रगती हीच संस्थेची खरी ओळख आहे. आर्थिक अडचणीच्या काळात सभासदांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सक्षम करण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता ठेवून सभासदांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

प्रास्ताविक मनोज क्षीरसागर यांनी केले. त्यांनी संस्थेच्या विविध कर्ज योजना व भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन दत्तात्रय डोळसे यांनी केले. दीपक भागवत यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## खरा तो एकचि धर्म




संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे विचार व त्या विचारानुरूप होणारा आचार, हाच धर्मप्रचार. विपरित वागणे हा अधर्मप्रकार. वेगवेगळे धर्म म्हणणे व मानणे हा मनाला जडलेला विकार. माणसे माणसांच्याच जिवावर उठणार दंगे, प्राणहानी करण्यास ही विपरित बुद्धी कारण ठरणार. हे होऊ नये महाभारत धर्माची सोपी व्याख्या करते.

सगळी शास्त्रे सांगतात, की महत्त्व आहे तुमच्या वागण्याचे. माणसाच्या सर्वांगीण भल्यासाठी चिंतिलेल्या सुविचारानुसार आचार करण्याचे. या अत्याचारातून धर्म निर्माण होतो. सर्व मानवजातीच्या भल्यासाठी विचार करुन आचार करणारे दीर्घायुषी होतात. मानवजातीच्या भल्यासाठी न घडणारा आचार हा दुष्ट वर्तनप्रकार. मग त्याला धर्म कसे म्हणणार? कोणीही दुष्टपणा कसा चालू देणार ? माणसामाणसात भेद करून एकमेकांच्या जिवावर उठायला प्रवृत्त करणार आणि त्या आचाराला तुम्ही धर्म म्हणून संबोधणार? असे नसेल, तर धर्म एकच असेल आणि आहेच. केवळ स्वार्थासाठी वेगवेगळी नावे देउन अनेक धर्म माजवणे आणि त्या सर्वांप्रती समभाव राखणे, हे केवळ डोळ्यात धूळ फेकणे धर्माला समभाव नाही. एकच भाव आहे आणि तो आहे, मानवकल्याण।

पण आज धर्म म्हणजे विकृत कर्म, असे समीकरण मांडतात सर्व. धर्माच्या नावाखाली आज घडतो आचार, पण त्याचे मूळ असते विकृत विचार.

हाच धर्म एकच तो सर्वत्र. कोणता बरे? वयाने लहान असो की मोठा.. पैशाने श्रीमंत असो वा गरीब. जात असेना का कुठलीही. अगदी हीन, तो माणूस असो वा स्त्री, या, सगळे एकत्र या आणि एकच विचार करा, की सगळ्यांची चिंता कशी दूर होईल ?

यापेक्षा आणखी उत्तम व्याख्या धर्माची करता येईल ?

एक गोष्ट आहे. एका वेड्यांच्या इस्पितळात एक धर्मोपदेशक गेला. तासभर आपल्याच धर्माबद्दल व्याख्यान देत बसला. एक वेडा त्याचे व्याख्यान मन लावून ऐकताना दिसला. मध्येच तो वेडा जोरदार दाद द्यायचा. व्याख्याता खूप सुखावला. व्याख्यानानंतर तो वेडा इस्पितळाच्या प्रमुख अधिकाऱ्यांशी काहीतरी बोलला. व्याख्याता त्या अधिकाऱ्याकडे गेला व विचारायला लागला, तो वेडा माझ्याबद्दल काही बोलला? माझे व्याख्यान आवडले त्याला ?

पण त्या अधिकाऱ्याने उत्तराची टाळाटाळ केली. व्याख्याता मात्र चुप बसला नाही. त्या अधिकाऱ्याला पुन्हा म्हणाला, अहो, सांगा ना. तो वेडा माझ्याच व्याख्यानाबद्दल काही बोलत होता ना तुमच्याशी ? होय.

मग काय म्हणाला ते सांगा ना.

अधिकारी म्हणाला, 'तो वेडा माझ्याजवळ न्याय मागू लागला.' म्हणाला खरं तर मी बाहेर आणि हा व्याख्याताच आत असायला हवा होता. नाही का ? वेड्यालाही कळते, ते धर्मांधांना कुठे समजते?

– किशोर गांधी

# अल–करम हॉस्पिटल व फाउंडेशन आयोजित 'रक्तदान शिबिरा'ला नागरिकांचा प्रतिसाद

**ईद–उल–अज्हा (बकरी ईद) निमित्त अनोखी 'कुर्बानी'; मानवतेचा अनोखा संदेश**

नगर – अल–करम हॉस्पिटल आणि फाउंडेशनच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. किंन्सगेट रोड, इंगळे मेडिकलसमोरील अल–करम हॉस्पिटल येथे सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत हे शिबिर पार पडले 'ईद–उल–अज्हा' (बकरी ईद) निमित्ताने समाजाप्रती सर्वोच्च त्याग पत्करत संस्थेने रक्ताची 'कुर्बानी' देण्याचे आवाहन केले होते.

अल–करम हॉस्पिटल आणि फाउंडेशन हे केवळ एकाच उपक्रमापुरते मर्यादित नसून वर्षभर सामाजिक कार्यात अग्रेसर असते. १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन) असो की २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), या राष्ट्रीय उत्सवांचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिरे घेतली जातात. इतकेच नव्हे तर, 'ईद मिलादुन्नबी', 'रमजान ईद' यांसह विविध धार्मिक सण आणि उत्सवांच्या काळातही रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. सर्वधर्मीय सलोखा आणि देशप्रेम जपण्याचे अनोखे कार्य हे फाउंडेशन सातत्याने करत आहे.

फाउंडेशनचे अध्यक्ष तोफिक तांबोळी अत्यंत भावूक झाले ते म्हणाले, ईद–उल–अज्हा हा सण आपल्याला केवळ प्राण्यांची कुर्बानी देणे शिकवत नाही, तर मानवी कल्याणासाठी स्वतःचे सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा देतो. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने सरकारी आणि खासगी रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे.



अल–करम हॉस्पिटल व फाउंडेशन आयोजित 'रक्तदान शिबिरा'ला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

अनेक गरीब रुग्ण रक्ताअभावी मृत्यूच्या दारात उभे आहेत. हीच भीषण परिस्थिती ओळखून आम्ही या ईदला रक्ताची 'कुर्बानी' देण्याचा निर्णय घेतला. आज आमच्या एका हाकेवर मुस्लिम बांधवांसह सर्वधर्मीय तरुणांनी धावून येत रक्ताचे दान केले. हीच खरी ईश्वराची भक्ती आणि खरी कुर्बानी आहे.

डॉ. अशपाक पटेल यांनी रक्तदात्यांचे आभार मानताना या उपक्रमामागील वैद्यकीय आणि मानवी दृष्टिकोन मांडला. ते म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रात काम करताना रक्ताअभावी तडफडणारे रुग्ण आम्ही रोज पाहतो. उन्हाळ्यात हा त्रास अधिक वाढतो. आज या शिबिराच्या माध्यमातून जमा झालेला रक्ताचा प्रत्येक थेंब हा रुग्णालयात मृत्यूशी झुंज देणाऱ्या एखाद्या निष्पाप जिवाला जीवनदान देणार आहे. कोणाच्या तरी घराचा विझणारा दिवा या रक्तामुळे पुन्हा पेटणार आहे. रक्तदात्यांनी केवळ रक्त दिले नाही, तर अनेकांना जगण्याची नवी आशा दिली आहे. शरीरासाठीही रक्तदानाचे अनेक फायदे असून यामुळे नवीन रक्तपेशी तयार होतात व हृदयाचे आरोग्य उत्तम राहते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अल–करम टीमच्या अनेक ांनी परिश्रम घेतले यामध्ये शेराअली शेख, अर्शद सय्यद, रझिक खान तौसिफ सय्यद, ऐजाज तांबोळी, समीर सय्यद आणि मजीद शेख या सर्वांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून रक्तदात्याचे स्वागत केले आणि संपूर्ण शिबिराचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सांभाळले.

रझिक खान यांच्या पुढाकारामुळे महिला रक्तदात्यांनीही या शिबिरात सहभाग नोंदवला.



सनातन धर्म सभा येथे आयोजित 'श्री संगीत गुरूचरित्र पारायण' कार्यक्रमात सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांचा सत्कार पसायदानाची फेम भेट देवून गौरव करण्यात आला.

# स्वरमयी संगीत गुरूचरित्राने भक्तिभाव जागवला

**सनातन धर्म सभेत कुलकर्णी दाम्पत्याचे सादरीकरण; दत्तभक्तांचा प्रतिसाद**

नगर – सनातन धर्म सभा येथे आयोजित 'श्री संगीत गुरूचरित्र पारायण' कार्यक्रमात भक्तिरसाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांनी पद्यरूपी गुरूचरित्राचे सुमधुर गायन सादर करत उपस्थित दत्तभक्तांना मंत्रमुग्ध केले.

या पद्यरूपी गुरूचरित्राचे रचनाकार श्री शिवरूपी महाराज हे उत्तर हिंदुस्थानातील रहिवासी होते. शिवस्वरूप विनरावजी हे त्यांचे मूळ नाव असून हिंदी ही त्यांची मातृभाषा होती. उर्दू, पारसी, संस्कृत व मराठी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इंग्रजांच्या काळात अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी ईश्वरभक्तीच्या प्रेरणेने पदाचा राजीनामा देत श्री घृष्णेश्वर मंदिर येथे सेवा सुरू केली. गुरूचरित्राच्या अनुष्ठानादरम्यान त्यांची भेट गुरु श्री ब्रह्मानंद स्वामी यांच्याशी झाली. त्यांच्या आज्ञेनुसार सात भाग आणि सुमारे १०८ पदांनी समृद्ध असे हे 'संगीत गुरूचरित्र' तयार झाले. उत्कृष्ट काव्य असूनही छपाईअभावी हा वारसा मर्यादित स्वरूपातच जतन झाला आहे.

कार्यक्रमात संवादिनीवर श्रीमती स्वाती आंबेकर तर तबल्यावर अच्युत घबाडे यांनी सुरेल साथसंगत केली. सतिश मधुकर कुलकर्णी आणि सौ. हेमा सतिश कुलकर्णी यांचा सत्कार पसायदानाची फेम भेट देवून गौरव करण्यात आला. यावेळी नीलकंठ देशमुख, दिनकर देशमुख, उमेश वाळुजकर, उमेश नगरकर व बंडोपंत मुळे यांच्यासह अनेक दत्तभक्त उपस्थित होते.

# महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांच्या ६५ व्या दीक्षा दिनानिमित्त जैन मंदिराच्या वतीने गोशाळांना सात लाख रुपयांची आर्थिक मदत

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे ज्येष्ठ शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराजा साहेब यांच्या ६५ व्या दीक्षा दिनानिमित्त जैन मंदिर ट्रस्टचे वतीने मिरी गोशाळेला ६५ हजार रुपये आर्थिक मदत गायींच्या हिरव्या चाऱ्यासाठी करण्यात आली. याशिवाय दिक्षा दिनानिमित्त इतर ठिकाणी नगर येथील पांजरपोळ गोरक्षण संस्था, निंबळक गोशाळा, अरुणोदय गोशाळा, श्रीगोंदा, करमाळा, लातूर, यादगिरी (कर्नाटक), भंडारा, नागपूर, पाबळ, मुंबई, वर्धा, आश्वी (ता. संगमनेर) येथील विविध गोशाळांना एकूण ७ लाख रुपये आर्थिक मदत मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांच्या हस्ते देण्यात आली. जैन मंदिर ट्रस्टने यापूर्वीही वेळोवेळी विविध गोशाळांना आर्थिक मदत केली आहे.



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे ज्येष्ठ शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराजा साहेब यांच्या ६५ व्या दीक्षा दिनानिमित्त जैन मंदिर ट्रस्टचे वतीने मिरी गोशाळेला ६५ हजार रुपये आर्थिक मदत गायींच्या हिरव्या चाऱ्यासाठी करण्यात आली.

याप्रसंगी आलोकऋषीजी महाराजा साहेब, मंदिराचे ट्रस्टी लालचंद कासवा, राजू बी.शहा, डॉ. सागर पटवा, महेंद्र मेहेर, संजय बेदमुथा, दीपक शहा, जगदीश शहा, जयकुमार पुंगलिया, पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे मॅनेजर राजू पितळे, अरूणोदय गोशाळेचे संजय कटारिया, निंबळक येथील गोशाळेचे गौतम कराळे उपस्थित होते.

कुंदनऋषीजी महाराजा साहेब म्हणाले की, जैन धर्मात अहिंसा आणि भूतदयेला अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक प्राणीमात्राला जगण्याचा तितकाच अधिकार आहे. गायीला तर मातेचा दर्जा आहे. त्यामुळे गोसेवा आणि गोमातेचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यासाठी सुभाष मुथा व त्यांचे सहकारी ट्रस्टी सातत्याने देत असलेले योगदान प्रशंसनीय आहे. यातून इतरांनाही चांगली प्रेरणा मिळते.

आलोकऋषीजी महाराजा साहेब यांनीही जैन मंदिर ट्रस्टच्या गोसेवेच्या कार्याचे कौतुक करून ट्रस्टी मंडळाला या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सुभाष मुथा म्हणाले, कुंदनऋषीजी महाराजा साहेब यांचे आशीर्वाद सकल संघासाठी आदर्शवत आहेत. त्यांच्या ६५ व्या दीक्षा दिनानिमित्त जाणीवपूर्वक गोशाळांना ७ लाख रुपयांची भरीव आर्थिक मदत केली आहे. सध्याच्या तीव्र उन्हामुळे हिरवा चारा, कडबा, पाण्याची टंचाई भासत आहे. गोसेवा करणाऱ्या संस्थांना या प्रतिकूल परिस्थितीत मदत करणे आवश्यक आहे. समाजातील दानशूर मंडळी साधू भगवंतांच्या आशीर्वादाने या कार्यासाठी हातभार लावतात. जैन मंदिर सातत्याने नगरसह राज्यभरात गोशाळांना आर्थिक मदत करून पुण्य कर्म करत आहे. आपल्या संस्कृतीत गोसेवेला ईश्वर सेवा मानले जाते. समाजातील जास्तीत जास्त व्यक्तींनी उत्स्फूर्तपणे आणि कर्तव्य भावनेने या कार्यात योगदान द्यावे असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले.





इस्कॉनच्या वतीने श्रीमद् भागवत कथा सोहळ्यानिमित्त शहरात संकीर्तन शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

# इस्कॉनच्या वतीने श्रीमद् भागवत कथा सोहळ्यानिमित्त शहरात संकीर्तन शोभायात्रा उत्साहात

नगर – येथील आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) चे वतीने नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. सकाळी माळीवाड्यातील श्री विशाल गणपतीचे पूजन आणि महाआरती करण्यात आली. मंदिराचे पूजारी महंत संगमनाथ यांच्या हस्ते श्रीमद् भागवत ग्रंथाचे पूजन करण्यात आले. माळीवाडा देवस्थानचे विश्वस्त–सचिव अशोक कानडे, विश्वस्त चंद्रकांत फुलारी यांच्या हस्ते इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. श्री.कानडे यांनी इस्कॉनचा हा कथा सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा, अशी विशाल गणपती चरणी प्रार्थना केली.

यावेळी श्रीपादसेवा दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, मदन कांबळे, मिलिंद चवंडके, मुकुंदसंजय दास, कमलिनी माताजी, डॉ.अंजली फाटके, भिंगार अर्बन बँकेचे संचालक कैलास खरपुडे, बबनराव गोरे, अशोक बाबर यांच्यासह इस्कॉनचे स्त्री–पुरूष भाविक उपस्थित होते. ही शोभायात्रा माळीवाडा वेस, आयुर्वेद कॉलेज, नवीन टिळक रोड मार्गे माऊली सांस्कृतिक भवनमध्ये पोहोचली.

महिला केशरी रंगाच्या साड्या परिधान करून मंगल कलश घेऊन शोभायात्रेत सहभागी झाल्या होत्या. पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा पोषाख परिधान केला होता. फुलांनी सुशोभित केलेल्या रथात निताई (बलराम) आणि विश्वंभर (कृष्ण) हे नयनमनोहर विग्रह होते. हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।। हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।। हे संकीर्तन मधुर स्वरात करत ही शोभायात्रा कथा स्थळी माऊली सांस्कृतिक भवनमध्ये पोहोचली.

सायंकाळी ५.३० वाजता पुण्यातील इस्कॉन मंदिराचे ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांच्या अमृतवाणीमधून श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा श्रीगणेशा करण्यात येणार आहे. ३१ मे पर्यंत दररोज सायंकाळी ५.३० ते रात्री ८.३० या वेळेत कथा निरूपण केली जाईल. भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास यांनी केले आहे.

# श्री बालाजी देवस्थानमध्ये विष्णू पंचायतन याग उत्साहात

नगर – शहरातील खिस्त गल्ली परिसरातील श्री बालाजी देवस्थान येथे २३ व २४ मे रोजी दोन दिवसीय विष्णू पंचायतन यागाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी उपस्थित राहून दर्शन, धार्मिक विधी आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.



श्री बालाजी देवस्थानात विष्णू पंचायतन याग उत्साहात झाला.

कार्यक्रमाची सुरुवात २३ मे रोजी सकाळी ५ ते ७ या वेळेत महाअभिषेक, तुलसी अर्चन व पुष्प सहस्त्रअर्चनाने झाली. भक्तांच्या मंत्रोच्चारांनी व वेदघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

२४ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत विधिवत विष्णू पंचायतन याग पार पडला. त्यानंतर दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी उमेश श्रीकांत खांडकेकर, संजय सप्तर्षी, श्रीकृष्ण बिवलकर, राजेश भिडे आणि सागर देशपांडे यांनी यजमान म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच उमेश खांडकेकर, श्रीराम पोळ गुरुजी, प्रसाद देव, औ इत्वधने, समर्थ सप्तर्षी आणि वेदांत कुलकर्णी यांनी गुरुजी म्हणून विविध धार्मिक विधी संपन्न केले.

भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# समाज परिवर्तनासाठी चांगले विचार देण्याचे विचार भारतीचे काम निःस्पृह

**वेदांतचार्य देविदास म्हस्के महाराज यांचे प्रतिपादन; ग.म मुळे स्मृती व्याख्यानमालेस प्रारंभ**



विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना वेदांतचार्य देविदास म्हस्के महाराज. समवेत आमदार संग्राम जगताप आदी.

नगर – भगवंताने मानवाला अन्य पशु पक्षादिकांपेक्षा विचार व सामर्थ्य हे वेगळे दिले आहे. त्या विचाराचा उपयोग आपण कसा करतो त्यावरती आपलं जीवन अवलंबून आहे. ज्ञानोबारायांनी किंवा अन्य संतांनी देखील मानवी जीवनाचे उभय कल्याण करणारे विचार मांडलेले आहेत. मुघलांनी आपल्यावर बाह्य आक्रमण करून मंदिर उद्ध्वस्त केली, स्त्रिया भ्रष्टविल्या, संपत्ती लुटली, ग्रंथ संपदा जाळली, धर्मांतरण केले. पण इंग्रजांनी आपल्या बुद्धीवर आक्रमणं केली, मंदिरं पाडली नाहीत पण त्या मंदिरात जाण्याची बुद्धी, संस्कृतीच नष्ट करून टाकली. वैचारिक बुद्धीवर झालेल्या या हल्ल्यामुळे आता इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणाच्या वाढत्या प्रभावामुळे शिकलेली माणसं आता आपल्याच पूर्वजांना, संस्कृतीला व गौरवशाली इतिहासाला नावं ठेवू लागली आहेत. अशा परिस्थितीत समाज परिवर्तनासाठी पूर्ण मानवजातीला चांगल्या विचारांची नितांत गरज आहे. असे चांगले विचार देण्याचे काम विचार भारती निःस्पृहतेने करत आहे, या वैचारिक परिवर्ताच्या प्रयत्नांमुळे ज्ञानेश्वर माऊलींनी श्रीगुरुकडे जे पसायदान मागितले ते प्रत्यक्षात येणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थांचे विश्वस्त वेदांतचार्य देविदास म्हस्के महाराज यांनी केले.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन वेदांतचार्य देविदास म्हस्के महाराज यांच्या हस्ते माऊली सभागृहात झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप, विचार भारतीचे अध्यक्ष अरुणराव कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक रवींद्र मुळे, सचिव सुधीर लांडगे, उद्योजक नंदन कामत, व्याख्यानमालेच्या प्रथम पुष्पाचे वक्ते लेखक अभिजित जोग आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. अहिल्यानगर गौरव गीताने कार्यक्रमास सुरवात झाली. व्याख्यानमालेचे हे १६ वे वर्ष आहे.

प्रास्ताविकात रवींद्र मुळे म्हणाले की, थिंक ग्लोबली, अॅक्ट लोकली. जगामध्ये जे काही चांगलं घडवायचं असेल तर त्याची सुरवात तुमच्या गावापासून करावी लागते आणि त्यासाठी आत्मबोध जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत तुम्ही आत्मविस्मृतीतून बाहेर येत नाही. जसा आपल्याला आत्मबोध झाला पाहिजे तसा आपल्याला शत्रू बोध पण समजला पाहिजे. जर शत्रूबोध समजला नाही तर काय घडतं हे आपण अनुभवतोय. पुढच्या काळामध्ये तरुणांना सिद्ध करण्यासाठी या वैचारिक युद्धामध्ये आपल्याला योद्ध्यासारखं काम करावं लागणार आहे. याच उद्देशाने विचार भारती गेल्या १६ वर्षांपासून या व्याख्यानमालेच्या माध्यमातून समाजात वैचारिक परिवर्तनासाठी प्रयत्नशील आहे.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते व केमिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते माऊली सभागृहातील मंदिरातील विठ्ठल, रुक्मिणी व संत ज्ञानेश्वर महाराजांची आरती करण्यात आली. व्याख्यानमालेचे प्रमुख प्रशांत आढाव यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. राजेंद्र पाचे, राहुल गांधी, दिनेश अग्रवाल यांनी पाहुण्यांचा सत्कार केला.

डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. श्रेयस लहामगे यांनी आभार मानले.

यावेळी व्याख्यानमाला संयोजन समितीचे सदस्य राजेश झंवर, राजू लक्ष्मण, चंद्रकांत पंडित, मनोज झंवर, रवींद्र बारस्कर, श्रीगोपाल जाखोटीया, उदय भणगे. डॉ, विक्रम दीडवाणिया, अशोक सागडे, अमित खामकर, निनाद टिपुगडे, यश निंबाळकर, सुनील नागोरी, डॉ. नीलकंठ ठाकरे, राजेंद्र तागड, मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते.

# आर्किटेक्ट किरण कांकरीया यांना ‘एसा’स्थापत्य स्पर्धेत प्रथम पुरस्कार



नगर – Architects Engineers and Surveyors Association आयोजित स्थापत्य प्रकल्प स्पर्धेमध्ये आर्किटेक्ट किरण कांकरीया यांना सामाजिक इमारत (Social Building) या गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

या स्पर्धेमध्ये त्यांनी सादर केलेला A.N.P.T. (Anand Navkar Public Trust) स्कूल बिल्डिंग कॉम्प्लेक्स हा प्रकल्प उत्कृष्ट नियोजन, सामाजिक बांधिलकी, वास्तुशिल्पीय दृष्टीकोन आणि कार्यक्षमतेमुळे विशेष ठरला. या प्रकल्पासाठी साइट इंजिनिअर इंजी. सचिन डागा, आर.सी.सी. कन्सल्टंट इंजी. सतीश मराठे पुणे, कॉन्ट्रॅक्टर सिद्धी कन्स्ट्रक्शन यांनी योगदान दिले.

हा पुरस्कार समारंभ २३ मे रोजी झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाचे राज्य संचालक, जितेंद्र भोपळे, आमदार संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया उपस्थित होते.

आर्किटेक्ट किरण कांकरीया यांना यापूर्वीही स्थापत्य क्षेत्रातील अनेक उल्लेखनीय प्रकल्पांसाठी विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये : साईबन येथील ॲम्फी थिएटर, विद्युत दाहिनी (इलेक्ट्रिकल स्म शानभूमी प्रकल्प), स्वतःचा स्थपती हा बंगला, अहिल्यानगर येथील कॉर्पोरेशन बिल्डिंग या प्रकल्पांचा विशेष उल्लेख होतो. तसेच त्यांना थिएटर अकॅडमी प्रकल्पासाठी University of Mysore कडून सुवर्णपदक प्राप्त झाले असून Thatcher Award सारख्या पुरस्कारांनीही गौरविण्यात आले आहे.

त्यांच्या काही महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये अहमदनगर डिस्ट्रिक्ट को–ऑप. बँक, अहिल्यानगर – फसाड ट्रीटमेंट, जालना व भिलारा येथील लोटस टेंपल, आनंदऋषी हॉस्पिटल, चांदवड येथील शैक्षणिक संकुल, चाकूर येथील मराठवाडा कृषी विद्यापीठ कॅम्पस डिझाईन, लातूर येथील थिएटर डिझाईन, नागोर, राजस्थान येथील श्री जैमल सोशल कॉम्प्लेक्स यांचा समावेश आहे.

# आर्किटेक्ट तुषार चांडक व इंजिनिअर ओमप्रकाश चांडक यांना ‘बेस्ट स्ट्रक्चर ॲवॉर्ड’ प्रदान

नगर – आर्किटेक्ट, इंजिनअर व सर्व्हेअर असोसिएशन, अहिल्यानगर व पोलाद स्टील लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आर्किटेक्ट तुषार चांडक व इंजिनिअर ओमप्रकाश चांडक यांना बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले. २०० स्क्वेअर मीटरवरील बांधकाम असलेल्या रेसिडेन्शियल बंगलो असलेल्या कॅटेगरी मधे चांडक यांना पहिल्या क्रमांकाने गौरविण्यात आले.

उत्कृष्ट आर्किटेक्ट व उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक म्हणून त्यांना हा अवार्ड प्राप्त झाला. हा पुरस्कार कमल आनंदराम मुनोत यांचे वास्तूस प्रदान करण्यात आला आहे. सदर वास्तूचे आरसीसी डिझाइन पंकज झावरे यांनी केले. सदर पुरस्कार जितेंद्र भोपळे डायरेक्टर टाउन प्लानिंग डिपार्टमेंट, महाराष्ट्र राज्य पुणे, सहायक संचालक स्नेहल यादव, अभिजीत देवी, प्रदीप तांदळे, भूषण पांडव, संजय चांदवले यांचे हस्ते देण्यात आला.

तुषार चांडक यांना यापूर्वी ४० अंडर ४० इलाईट एंड ट्रेंड सेटर आर्किटेक्ट ॲण्ड इंटेरियर डिझायनर ऑफ द ईयर २०२४ हा पुरस्कार मिळाला आहे. त्याच प्रमाणे इंडिया ट्रेड सेटर २०२४ गोवा येथेही प्रीमियम रेसिडेंन्शियल कॅटगरी मध्ये ’बेस्ट आर्किटेक्ट ऑफ द ईयर’ २०२४ हा पुरस्कार मिळाला आहे. त्याचप्रमाणे इंडियन कॉंक्रेट इन्स्टिट्यूट, पुणे आणि अल्ट्राटेक सिमेंट यांचे तर्फे बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड २०२५ मिळाला आहे.



आर्किटेक्ट, इंजिनअर व सर्व्हेअर असोसिएशन, अहिल्यानगर व पोलाद स्टील लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आर्किटेक्ट तुषार चांडक व इंजिनिअर ओमप्रकाश चांडक यांना बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २९ मे रोजी मोफत महिला आरोग्य तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिर

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २९ मे रोजी सकाळी १० ते २ यावेळेत स्त्री रोग व गर्भवती महिला मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये महिला विकारावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. शिबिरात दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, नॉर्मल डिलिव्हरी, बिजांड कोशावरील गाठी काढणे, हिस्टेरोसाल्फिन्जीओग्राफी, सिझेरियन, गर्भाशयाची पिशवी काढणे, वंध्यत्व तपासणीसाठी गर्भनलिकेची ट्युबल पेंटेन्सी, गर्भाशयाच्या अस्तराचा आतला तुकडा तपासणे सवलतीच्या दरात केल्या जातील. गर्भवती महिलांच्या सर्व चाचण्या सोनोग्राफी, रक्त तपासणी, लसीकरण, रक्तवाढीचे व न्यूट्रीशिनल मेडिसीन सवलतीच्या दरात दिले जाईल. गर्भवती महिलांचा आहार, घ्यावयाची काळजी यासंबंधी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये ( संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये ( संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). मोफत मणके विकार तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

# ‘निधी आपके निकट’ कार्यक्रमाचे राहाता येथे २८ मे रोजी आयोजन

नगर – निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी ‘निधी आपके निकट’ हा विशेष कार्यक्रम २८ मे रोजी सकाळी ९.३० वाजता पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे सहायक भविष्य निर्वाह निधी आयुक्त यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील तरुणांनी उद्योग क्षेत्रात क्रांती घडवावी

**खासदार निलेश लंके यांचे आवाहन; राजयोग मिल्क प्रॉडक्ट्सचे उद्घाटन**



विळद पंचक्रोशीतील ’राजयोग डेअरी फार्म’ प्रस्तुत ’राजयोग मिल्क प्रॉडक्ट्स’ या अत्याधुनिक मॅन्युफॅक्चरिंग प्लांटचे उद्घाटन खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पार पडले,

विळद – ग्रामीण भागातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता उद्योग व्यवसायात उतरून स्वतःची ओळख निर्माण करावी, असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

विळद पंचक्रोशीतील ’राजयोग डेअरी फार्म’ प्रस्तुत ’राजयोग मिल्क प्रॉडक्ट्स’ या अत्याधुनिक मॅन्युफॅक्चरिंग प्लांटचे उद्घाटन खासदार निलेश लंके यांच्या हस्ते पार पडले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी बोलताना राजयोग मिल्क प्रॉडक्ट्सचे संचालक अमोल कांबळे व अजय कांबळे म्हणाले की, ग्राहकांना थेट शेतातून आलेले आणि कोणत्याही भेसळीशिवाय शुद्ध, उच्च दर्जाचे दुग्धजन्य पदार्थ पुरवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आम्ही हा मॅन्युफॅक्चरिंग प्लांट उभा केला आहे. आमच्याकडे शुद्ध दूध, घट्ट दही, मऊ पनीर, खवा, स्वादिष्ट कुल्फी, तूप, लोणी, हाय–कॅल्शियम प्रॉडक्ट्स तसेच खास चवीचे मिसळ व भिजवलेले (भिकयुक्त/भिजवलेले कडधान्य) पौष्टिक पदार्थ एकाच छताखाली अत्यंत हायजेनिक पद्धतीने तयार केले जाणार आहेत. ग्राहकांच्या आरोग्याची काळजी घेत शुद्धता आणि वाजवी दर हीच आमची ओळख राहील.

उद्घाटनप्रसंगी बोलताना खासदार निलेश लंके यांनी कांबळे बंधूंच्या धाडसाचे आणि कष्टाचे कौतुक केले. ते म्हणाले, आज दुग्ध व्यवसायाला खऱ्या अर्थाने आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे. अमोल आणि अजय या तरुण उद्योजकांनी ग्रामीण भागात इतका मोठा व अत्याधुनिक मॅन्युफॅक्चरिंग प्लांट उभारून स्थानिक तरुणांसमोर एक मोठा आदर्श ठेवला आहे. त्यांच्या या प्रकल्पामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला आधार मिळेलच, शिवाय ग्राहकांनाही शुद्ध आणि सकस दुग्धजन्य पदार्थ मिळतील. ’राजयोग’ ब्रँडने दर्जाशी कधीही तडजोड न करता संपूर्ण महाराष्ट्रात नाव कमवावे, हीच शुभेच्छा. या उद्योगाच्या पाठीशी आम्ही नेहमी खंबीरपणे उभे राहू.

या सोहळ्याला प्रवीण वारुळे, राकेश पुंडे, सचिन कराळे, गणेश रोडे, प्रमोद वारुळे, सागर जगताप, सुनील कोकरे, ओम् जरे यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी आणि महिला उपस्थित होत्या. कांबळे परिवाराच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

डेअरी आउटलेट व कुल्फी स्टॉलसाठी फ्रेंचायझी सुरू बुकिंगसाठी संपर्क ९३७२९३९९९९

# ‘भीमथडी साहित्य संमेलना’मध्ये नाना डोंगरे यांचा विशेष सन्मान



भीमथडी साहित्य संमेलनात नाना डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला.

नगर – चौफुला केडगाव (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित राज्यस्तरीय भीमथडी साहित्य संमेलनात ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. २३ व २४ मे रोजी दोन दिवस पार पडलेल्या या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार राहुल कुल यांच्या हस्ते उत्साहात झाले.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, ज्येष्ठ साहित्यिक फ. मु. शिंदे, संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांच्यासह पै. डोंगरे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

यावेळी आमदार राहुल कुल यांनी पै. नाना डोंगरे यांच्या सामाजिक व साहित्य क्षेत्रातील कार्याचे विशेष कौतुक करत, ग्रामीण भागात साहित्य आणि समाजकारणाची प्रभावी चळवळ उभी करण्याचे काम डोंगरे यांनी केले आहे. त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट केले.



बी दी चेंज फाउंडेशनतर्फे शिर्डी येथे जालिंदर बोरुडे यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

# महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने जालिंदर बोरुडे सन्मानित

नगर – बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने शिर्डी येथे जालिंदर बोरुडे यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आणि नेत्रदान या चळवळीत सक्रीय योगदान देऊन समाज परिवर्तनासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल हा सन्मान बोरुडे यांना प्रदान करण्यात आला.

साई पालखी निवारा सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात कॅप्टन संजय कुमार यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संदीप कोळी, नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते, उद्योजक संजय वाबळे, अभिनेत्री निवेदिता पगार, महसूलचे सुरेश घोडके, फाऊंडेशनचे अध्यक्ष अभिषेक तुपे आदीं उपस्थित होते.

कॅप्टन संजय कुमार म्हणाले की, जालिंदर बोरुडे सारख्या सेवाव्रतींच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळत आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे. लाखो व्यक्तींचे नेत्रदोष दूर करुन त्यांनी गरजूंना आधार दिला असल्याचे ते म्हणाले.

तसेच पोलीस निरीक्षक संदीप कोळी व नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते यांनी आपल्या मनोगतामध्ये फिनिक्स फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे. त्यांनी स्वखर्चाने विविध शिबिरे आयोजित करून हजारो गरजू आणि नेत्रदोष असलेल्या रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी दिली आहे. याशिवाय त्यांनी नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाची जागृती करून अनेकांकडून नेत्रदान घडवून आणले आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रमही सातत्याने राबविले जात आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

# मान, पाठ, कंबर, गुडघेदुखीवर नगरमध्ये प्रथमच मोफत उपचार शिबिराचे आयोजन

नगर – नगरकरांना आयुर्वेदाच्या प्रभावी उपचारांआधारे आजारमुक्त करण्याच्या सद् हेतूने प्रथमच तेही मोफत विना औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. अर्जुन घुले यांनी दिली.

ते म्हणाले, आठवड्यातील प्रत्येक बुधवारी आणि शनिवारी सकाळी ९ ते दुपारी २ आणि संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत डॉ. घुले हॉस्पिटल, गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, नागापूर, एम आय डी सी, अहिल्यानगर येथे मोफत विना औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

मान, पाठ, कंबर, खांदेदुखी, मणक्यांमध्ये गॅप, स्लिपडिस्क मणक्यांमधील नस दबणे, हातांना व पायांना मुंग्या येणे, गुडघेदुखी (लिगॅमेंट एन्जुरी) यांवर अत्यंत प्रभावी पध्दतीने, न्युरो मर्माथेरपी आधारे उपचार केले जातील. व्हॅक्युमकपिंग, ब्लडकपिंग, रक्तमोक्शन आणि अग्निकर्माने यशस्वी उपचार केले जातील.

शिबिरास येण्याअगोदर ९४२०६४३४३२ किंवा ८८३०९३०२९२ या नंबरवर संपर्क साधून नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

नाव नोंदणी केलेल्या रूग्णांनाच शिबिरात प्रवेश दिला जाईल. शिबिरास येताना एक्सरे एमआरआयचे रिपोर्ट आणि फिल्म सोबत आणणे आवश्यक आहे.

नगर शहर आणि जिल्ह्यामधील रूग्णांनी शिबिराचा लाभ घावा, असे आवाहन डॉ.अर्जुन घुले आणि डॉ. निर्मला घुले यांनी केले आहे.

# प्रा. वर्षा पाठक यांना काव्य शिरोमणी पुरस्कार



नगर – साहित्य, शिक्षण आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रा. सौ. वर्षा सचिन रोडे पाठक यांचा दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित साहित्य संस्कृती संगम संमेलन मध्ये इंटरनॅशनल आयकॉन डॉ. जयलक्ष्मी सानिपींना यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. सौ. वर्षा पाठक या गेल्या १४ वर्षांपासून अहिल्यानगर आकाशवाणी येथे नैमित्तिक उद्घोषिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी, अहिल्यानगर येथे ज्युनियर कॉलेज विभागात अध्यापनाचे कार्य करतात. याशिवाय हार्मोनी इंटरनॅशनल स्कूल, वडगाव गुप्ता येथे समुपदेशक म्हणूनही त्या कार्यरत आहेत.

# दहावीच्या परिक्षेत ९७.२ टक्के मिळवून सेक्रेड हार्ट स्कूलमध्ये मोहिका भंडारी प्रथम



भिंगार – येथील मोहिका भंडारी हिने १० वी च्या परिक्षेत ९७.२% गुण मिळवून सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल, अहिल्यानगरमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिला सिस्टर सेलेमा तसेच ज्योत्स्ना मिस, साजी मिस आणि अनेक शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच आजी कमलबाई भंडारी यांचे आशीर्वाद, अखंड मेहनत ही यशाचे कारण असल्याचे तिने सांगितले. सुहास भंडारी व पूनम भंडारी यांची ती कन्या आहे.

# बालगृहात दाखल करण्यात आलेल्या ‘कृष्णा’ या बालकाबाबत माहिती द्यावी

नगर – डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला–मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आलेल्या ‘कृष्णा’ नावाच्या बालकाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

संबंधित बालकाला श्रीगोंदा पोलीस स्टेशनमार्फत निरीक्षणगृहात दाखल करण्यात आले आहे. सदर बालक एका व्यक्तीसोबत भिक्षेकर अवस्थेत आढळून आला होता. या बालकावर हक्क सांगणारे माता–पिता, पालक किंवा अन्य नातेवाईकांनी तातडीने अधीक्षिका श्रीमती पौर्णिमा माने यांच्याशी ७०२०१२४७७१ अथवा बाल संरक्षण अधिकारी सर्जेराव शिरसाठ यांच्याशी ९९२१३०७३०२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# अर्थजगत

अर्थव्यवस्थेत क्रेडिट कार्ड हे केवळ खर्चाचे साधन राहिलेले नाही, तर ते व्यक्तीच्या आर्थिक विश्वासार्हतेचे महत्त्वाचे प्रतीक बनले आहे. दैनंदिन खरेदीपासून मोठ्या व्यवहारांपर्यंत अनेकजण क्रेडिट कार्डचा वापर करत आहेत. मात्र कालांतराने काही कार्डांचा वापर कमी होतो किंवा पूर्णपणे बंद होतो. अशा वेळी अनेक ग्राहक जुनी किंवा वापरात नसलेली क्रेडिट कार्डे बंद करण्याचा निर्णय घेतात. परंतु हा निर्णय घेताना त्याचा सिबिल स्कोअरवर होणारा परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

## क्रेडिट कार्ड बंद केल्यास सिबील स्कोअर सुधारतो?

आजच्या डिजिटल अनेकांना असे वाटते की वापरात नसलेले कार्ड बंद केल्याने आर्थिक शिस्त दिसून येते आणि त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होत नाही. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती वेगळी असू शकते. कारण क्रेडिट कार्ड बंद केल्यावर सर्वप्रथम व्यक्तीची एकूण उपलब्ध क्रेडिट मर्यादा कमी होते. याचा थेट परिणाम क्रेडिट युटिलायझेशन रेशोवर होतो. हा रेशो म्हणजे उपलब्ध एकूण क्रेडिटपैकी किती क्रेडिट वापरले जात आहे, याचे प्रमाण होय.




उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे पाच लाख रुपयांची एकूण क्रेडिट मर्यादा असेल आणि त्यातील दीड लाख रुपयांचा वापर होत असेल, तर त्याचा क्रेडिट युटिलायझेशन रेशो तुलनेने संतुलित राहतो. मात्र त्यातील एक मोठी क्रेडिट मर्यादा असलेले कार्ड बंद झाल्यास एकूण उपलब्ध मर्यादा कमी होते आणि वापराचे प्रमाण अचानक वाढल्याचे दिसू शकते. आर्थिक संस्थांच्या दृष्टीने हा संकेत जोखमीचा मानला जातो. सामान्यतः ३० टक्क्यांपेक्षा कमी क्रेडिट युटिलायझेशन रेशो अधिक सुरक्षित आणि सकारात्मक मानला जातो.

क्रेडिट स्कोअरवर परिणाम करणारा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे क्रेडिट हिस्ट्रीचा कालावधी. जुनी क्रेडिट कार्डे व्यक्तीची दीर्घकालीन आर्थिक शिस्त आणि परतफेडीची क्षमता दर्शवतात. अनेक वर्षे नियमित वापरात असलेले कार्ड बँक आणि वित्तीय संस्थांच्या दृष्टीने विश्वासार्हतेचे प्रतीक असते. त्यामुळे जुने कार्ड बंद केल्यास सरासरी क्रेडिट हिस्ट्रीची मुदत कमी होऊ शकते. परिणामी कर्ज देणाऱ्या संस्थांना संबंधित व्यक्तीची आर्थिक पार्श्वभूमी तुलनेने कमकुवत वाटू शकते.

तथापि, प्रत्येक परिस्थितीत क्रेडिट

**■ जाणून घ्या**

कार्ड कायम ठेवणे आवश्यकच असते असे नाही. काही कार्डांवर जास्त वार्षिक शुल्क आकारले जाते. काहीवेळा फसवणुकीचा धोका किंवा सुरक्षेच्या कारणांमुळेही कार्ड बंद करणे योग्य ठरू शकते. परंतु अशा वेळी एकाच वेळी अनेक कार्डे बंद करणे टाळणे आवश्यक मानले जाते. कारण त्यामुळे क्रेडिट प्रोफाइलवर अचानक नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

क्रेडिट कार्ड बंद करण्यापूर्वी स्वतःच्या संपूर्ण आर्थिक स्थितीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यामध्ये उपलब्ध एकूण क्रेडिट मर्यादा, सध्याचा खर्च, कार्डाचा वापराचा कालावधी, वार्षिक शुल्क आणि सुरक्षेशी संबंधित मुद्दे यांचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. काही वेळा कमी वापरात असलेले कार्ड बंद करण्याऐवजी त्याचा मर्यादित वापर सुरू ठेवणे अधिक फायदेशीर ठरू शकते.

आजच्या आर्थिक व्यवस्थेत सिबिल स्कोअरला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा वैयक्तिक कर्ज घेताना बँका सर्वप्रथम ग्राहकाचा सिबिल स्कोअर तपासतात. चांगला स्कोअर असल्यास कमी व्याजदरात कर्ज मिळण्याची शक्यता वाढते. उलट कमकुवत स्कोअरमुळे कर्ज मंजुरीत अडथळे निर्माण होऊ शकतात किंवा अधिक व्याजदराचा भार सहन करावा लागू शकतो.

त्यामुळे क्रेडिट कार्ड बंद करण्याचा निर्णय केवळ तात्पुरत्या सोयीच्या दृष्टीने न घेता, दीर्घकालीन आर्थिक परिणाम लक्षात घेऊनच घ्यावा लागतो. आर्थिक शिस्त, संतुलित कर्जवापर आणि दीर्घकालीन क्रेडिट इतिहास हे मजबूत सिबिल स्कोअरचे आधारस्तंभ मानले जातात. ◆◆◆

---

आजच्या डिजिटल अर्थव्यवस्थेत वैयक्तिक कर्ज घेणे अत्यंत सोपे झाले आहे. बँका, एनबीएफसी आणि विविध मोबाईल ॲप्स काही मिनिटांत लाखो रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देत आहेत. अचानक उद्भवलेली आर्थिक गरज, वैद्यकीय खर्च, शिक्षण, प्रवास किंवा इतर वैयक्तिक कारणांसाठी अनेकजण वैयक्तिक कर्जाचा आधार घेतात. मात्र नोकरी जाणे, व्यवसायातील तोटा किंवा उत्पन्नातील अनिश्चितता यांसारख्या कारणांमुळे कर्जाचे हप्ते भरणे कठीण झाल्यास अनेकांच्या मनात एक भीती निर्माण होते ह्व वैयक्तिक कर्जाची परतफेड न केल्यास तुरुंगवास होऊ शकतो का?




## पर्सनल लोन न फेडल्यास तुरुंगवास होऊ शकतो का?

कायद्याच्या दृष्टीने पाहिले, तर केवळ कर्ज फेडता न येणे हा गुन्हा मानला जात नाही. त्यामुळे बहुतेक प्रकरणांमध्ये फक्त ईएमआय थकवल्यामुळे एखाद्या व्यक्तीला थेट तुरुंगात पाठवले जात नाही. मात्र काही विशिष्ट परिस्थितींमध्ये कायदेशीर अडचणी गंभीर स्वरूप धारण करू शकतात. विशेषतः फसवणूक, बनावट कागदपत्रे किंवा जाणीवपूर्वक चुकीची माहिती देऊन कर्ज घेतल्याचे सिद्ध झाल्यास प्रकरण फौजदारी गुन्ह्याच्या चौकटीत जाऊ शकते.

**अनेकदा आर्थिक अडचणी वाढल्यानंतर लोक बँकेचे फोन घेणे टाळतात किंवा संपर्क तोडून टाकतात. मात्र ही परिस्थिती हाताळण्याची सर्वात चुकीची पद्धत मानली जाते. त्याऐवजी बँकेशी स्पष्टपणे संवाद साधणे अधिक योग्य ठरते. अनेक वित्तीय संस्था ईएमआय पुनर्रचना, परतफेडीचा कालावधी वाढवणे, तात्पुरती मुदतवाढ किंवा 'वन टाइम सेटलमेंट' यांसारखे पर्याय उपलब्ध करून देतात. त्यामुळे कायदेशीर वाद आणि मानसिक तणाव दोन्ही कमी होऊ शकतात.**

साधारणपणे कर्जाचे हप्ते थकू लागल्यानंतर बँका किंवा वित्तीय संस्था सर्वप्रथम फोन, संदेश आणि अधिकृत नोटिसांच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क साधतात. काही काळानंतर संबंधित कर्ज खाते 'नॉन–परफॉर्मिंग ॲसेट' अर्थात एनपीए म्हणून घोषित केले जाऊ शकते. याचा सर्वात मोठा परिणाम व्यक्तीच्या सिबिल स्कोअरवर होतो. भविष्यात नवीन कर्ज घेणे, क्रेडिट कार्ड मिळवणे किंवा इतर आर्थिक मंजुरी मिळवणे कठीण होऊ शकते.

जर थकबाकी कायम राहिली, तर बँक न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून वसुलीची कारवाई सुरू करू शकते. कर्जाच्या बदल्यात तारण किंवा हमी दिली असल्यास त्यावरही कारवाई केली जाऊ शकते. मात्र ही प्रक्रिया नागरी कायद्याच्या चौकटीत होत असते आणि ती थेट फौजदारी शिक्षेशी संबंधित नसते.

तुरुंगवासाचा प्रश्न मुख्यतः तेव्हाच निर्माण होतो, जेव्हा आर्थिक अडचणीपेक्षा फसवणुकीचा हेतू स्पष्ट दिसतो. उदाहरणार्थ, बनावट उत्पन्न दाखवणे, खोटे कागदपत्र सादर करणे, चुकीची माहिती देणे किंवा बँकेला जाणीवपूर्वक फसवून कर्ज घेणे अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये पोलिस तक्रार दाखल होऊ शकते. अशा वेळी फौजदारी गुन्हा नोंदवला जाऊन न्यायालयीन कारवाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे कर्ज फेडता न येणे आणि जाणीवपूर्वक आर्थिक फसवणूक करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या

**■ बँकिंग**

नियमांनुसार वसुली प्रतिनिधींनाही काही मर्यादा घालून देण्यात आल्या आहेत. ते कर्जदाराला धमकावू शकत नाहीत, अपमानास्पद भाषा वापरू शकत नाहीत किंवा रात्री उशिरा वारंवार त्रास देऊ शकत नाहीत. ठरावीक नियमांच्या चौकटीत राहूनच त्यांना संपर्क साधण्याची परवानगी असते. जर एखादा वसुली प्रतिनिधी गैरवर्तन करत असेल, सार्वजनिकरीत्या अपमान करत असेल किंवा दबाव निर्माण करत असेल, तर संबंधित व्यक्ती बँक, पोलिस किंवा रिझर्व्ह बँकेकडे तक्रार दाखल करू शकते. ◆◆◆

---

## पर्याय एचयुएफच्या माध्यमातून गृहखरेदीचा

वाढत्या मालमत्ता किमती, गृहकर्जाचे वाढते हप्ते आणि करबचतीची आवश्यकता यामुळे अनेक कुटुंबे आता पारंपरिक पद्धतींपलीकडे जाऊन आर्थिक नियोजनाचे पर्याय शोधत आहेत. अशा परिस्थितीत हिंदू अविभाजित कुटुंब अर्थात एचयूएफच्या माध्यमातून घर खरेदी करण्याची संकल्पना पुन्हा चर्चेत आली आहे. विशेषतः उच्च उत्पन्न असलेल्या संयुक्त कुटुंबांसाठी हा पर्याय करबचतीच्या दृष्टीने उपयुक्त मानला जात आहे.



भारतीय आयकर कायद्यानुसार एचयूएफला स्वतंत्र करदाते घटकाचा दर्जा देण्यात आला आहे. याचा अर्थ असा की एचयूएफची कमाई, खर्च आणि करगणना ही कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नापासून स्वतंत्र मानली जाते. त्यामुळे एचयूएफच्या नावावर मालमत्ता खरेदी केल्यास त्या मालमत्तेशी संबंधित करसवलती स्वतंत्रपणे मिळू शकतात. यामुळे कुटुंबाच्या एकूण करभारात काही प्रमाणात घट करता येते आणि करनियोजन अधिक प्रभावीपणे करता येते.

एचयूएफ ही पारंपरिक संयुक्त कुटुंब व्यवस्थेवर आधारित आर्थिक रचना आहे. यात कुटुंबातील सदस्य सामूहिकरित्या संपत्ती आणि गुंतवणुकीचे व्यवस्थापन करू शकतात. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य 'कर्ता' म्हणून आर्थिक निर्णय घेतो. एचयूएफचे स्वतंत्र पॅन कार्ड आणि बँक खाते असते. त्यामुळे त्याच्या नावावर घेतलेली मालमत्ता किंवा गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न हे एचयूएफचे उत्पन्न मानले जाते. हाच घटक करबचतीच्या दृष्टीने त्याला महत्त्वाचा बनवतो.

जर एचयूएफच्या नावावर गृहकर्ज घेतले गेले, तर आयकर कायद्यातील कलम ८०सी अंतर्गत मूळ रकमेवरील परतफेडीसाठी करसवलत मिळू शकते. तसेच कलम २४(ब) अंतर्गत गृहकर्जाच्या व्याजावरही वजावट घेता येते. या सवलती वैयक्तिक करदात्यांप्रमाणेच एचयूएफलाही लागू होतात. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांनी वैयक्तिक स्तरावर करसवलतींची मर्यादा आधीच वापरली असली, तरी एचयूएफच्या माध्यमातून अतिरिक्त करसवलतीचा लाभ घेता येऊ शकतो.

उच्च उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी ही पद्धत विशेषतः फायदेशीर मानली जाते. कारण संयुक्त गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन करताना करस्लॅबचा भार काही प्रमाणात संतुलित करता येतो. अनेक व्यापारी आणि उद्योजक कुटुंबे याच कारणामुळे एचयूएफच्या माध्यमातून मालमत्ता खरेदी करण्यास प्राधान्य देतात.

एचयूएफच्या नावावर घेतलेल्या मालमत्तेतून भाडे उत्पन्न मिळत असल्यास त्यावरही स्वतंत्र करगणना होते. यामुळे कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नात ती रक्कम जोडली जात नाही आणि त्याचा थेट परिणाम उच्च करस्लॅबवरील भार कमी होण्यात दिसून येतो. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती आधीच उच्च करस्लॅबमध्ये असेल आणि तिने स्वतःच्या

**■ गुंतवणूक**

नावावर दुसरी मालमत्ता घेतली, तर भाडे उत्पन्नावर अधिक कर भरावा लागू शकतो. मात्र तीच मालमत्ता एचयूएफच्या नावावर असल्यास भाडे उत्पन्न एचयूएफच्या खात्यात जमा होते आणि त्यावर स्वतंत्र कर आकारला जातो.

**■ हेही लक्षात ठेवा**

तथापि, यातील कायदेशीर पैलू समजून घेणे आवश्यक आहे. एचयूएफच्या मालमत्तेवर सर्व सदस्यांचा अधिकार मानला जातो. त्यामुळे भविष्यात मालमत्तेची विभागणी, वारसा हक्क किंवा कौटुंबिक मतभेद यांसारख्या प्रश्नांमुळे वाद निर्माण होऊ शकतात. कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू, विभक्त राहण्याचा निर्णय किंवा वारसाहक्कातील बदल यांमुळे कायदेशीर प्रक्रिया गुंतागुंतीची होण्याची शक्यता असते.

याशिवाय गृहकर्जाचे हप्ते, निधीचा स्रोत आणि आर्थिक व्यवहार पूर्णपणे पारदर्शक असणे आवश्यक आहे. आयकर विभाग आवश्यकतेनुसार व्यवहारांची चौकशी करू शकतो. त्यामुळे सर्व आर्थिक कागदपत्रे आणि व्यवहारांची नोंद व्यवस्थित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**■ तज्ज्ञांचे म्हणणे काय?**

एचयूएफचा पर्याय प्रामुख्याने मोठ्या संयुक्त कुटुंबांसाठी आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीची योजना करणाऱ्यांसाठी अधिक उपयुक्त ठरतो. लहान कुटुंबे किंवा मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी वैयक्तिक नावावर मालमत्ता खरेदी करणे अनेकदा अधिक सोपे आणि व्यवहार्य ठरू शकते. त्यामुळे केवळ करबचतीच्या उद्देशाने एचयूएफ स्थापन करणे योग्य ठरेलच असे नाही. कुटुंबाची रचना, आर्थिक गरजा आणि भविष्यातील नियोजन लक्षात घेऊनच निर्णय घेणे आवश्यक आहे. ◆◆◆

---



## सिक्युरिटी डिपॉझिट देण्यास घरमालक टाळाटाळ करत असल्यास...

देशातील महानगरांमध्ये घर भाड्याने मिळवणे हीच एक मोठी कसरत बनली असताना, त्याहून गंभीर समस्या म्हणजे प्रचंड सिक्युरिटी डिपॉझिटची मागणी. दिल्ली, मुंबई, बंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये अनेक घरमालक आजही सहा ते दहा महिन्यांच्या भाड्याइतकी रक्कम आगाऊ ठेव म्हणून घेतात. घर सोडताना हीच ठेव परत मिळवण्यासाठी भाडेकरूंना मोठा संघर्ष करावा लागतो. केंद्र सरकारने आदर्श भाडेकरार कायदा २०२१ लागू करून या समस्येवर काही प्रमाणात नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला असला, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही.

या कायद्यानुसार निवासी घरांसाठी घरमालकाला जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या भाड्याइतकीच सिक्युरिटी ठेव घेण्याची परवानगी आहे. व्यावसायिक मालमत्तांसाठी ही मर्यादा सहा महिन्यांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. मात्र हा कायदा केवळ मार्गदर्शक स्वरूपाचा असल्याने प्रत्येक राज्याने तो स्वतंत्रपणे स्वीकारल्याशिवाय तो पूर्णपणे लागू होत नाही. परिणामी अनेक राज्यांमध्ये जुनीच पद्धत सुरू असून मोठ्या रकमेच्या डिपॉझिटची मागणी अजूनही सामान्य मानली जाते.

**■ ग्राहकहित**

घर रिकामे करताना सर्वाधिक वाद सिक्युरिटी डिपॉझिटच्या परताव्यावरून निर्माण होतात. अनेकदा घरमालक विविध कारणे देत ठेव रकमेत मोठी कपात करतात. मात्र कायद्याच्या दृष्टीने घरमालकाला मनमानी पद्धतीने पैसे कापण्याचा अधिकार नाही. फक्त प्रत्यक्ष नुकसान झाले असल्यास किंवा भाडे, वीज, पाणी यांसारखी थकबाकी असल्यासच कपात करता येते. घरातील फर्निचर, फिटिंग्ज किंवा इतर वस्तूंना असामान्य नुकसान झाले असल्यास त्यासाठी खर्च वसूल केला जाऊ शकतो. तसेच भाडेकरारात स्पष्ट नमूद केलेल्या अटींनुसार काही कपात वैध मानली जाऊ शकते.

मात्र 'सामान्य झीज' आणि प्रत्यक्ष नुकसान यामध्ये स्पष्ट फरक आहे. भिंतींचा रंग कालांतराने फिका पडणे, फर्निचर जुने दिसणे किंवा नियमित वापरामुळे निर्माण होणारी किरकोळ झीज यासाठी भाडेकरूला जबाबदार धरता येत नाही. अनेक वेळा रंगकामाच्या नावाखाली पूर्ण सिक्युरिटी ठेव अडवून ठेवली जाते, परंतु अशा प्रकारची मनमानी कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य मानली जात नाही.

जर घरमालक सिक्युरिटी ठेव परत देण्यास टाळाटाळ करत असेल किंवा अन्यायकारक कपात करत असेल, तर भाडेकरूंनी गप्प बसण्याची गरज नाही. अशा वेळी सर्वप्रथम औपचारिक कायदेशीर नोटीस पाठवून कपातीचा तपशील आणि ठेव परताव्याची मागणी करणे आवश्यक ठरते. ज्या राज्यांमध्ये नवीन भाडेकरार कायदा लागू झाला आहे, तेथे भाडे प्राधिकरण किंवा न्यायाधिकरणाकडे दाद मागता येते. इतर ठिकाणी दिवाणी दावा दाखल करण्याचाही पर्याय उपलब्ध आहे. उशिरा परत मिळालेल्या रकमेवर व्याज आणि मानसिक त्रासाबद्दल नुकसानभरपाई मागण्याचाही अधिकार भाडेकरूंना असतो.

नवीन कायदा लागू नसलेल्या राज्यांमध्येही भाडेकरू पूर्णपणे असुरक्षित नाहीत. विविध राज्यांचे जुने भाडेनियंत्रण कायदे, भारतीय करार कायदा १८७२ आणि मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ यांच्या माध्यमातूनही त्यांना कायदेशीर संरक्षण मिळते.

तज्ज्ञांच्या मते, अशा वादांपासून बचाव करण्यासाठी काही मूलभूत खबरदारी आवश्यक आहे. नेहमी नोंदणीकृत भाडेकरार करणे, घरात प्रवेश करताना आणि घर रिकामे करताना छायाचित्रे व व्हिडीओ तयार ठेवणे, सर्व देयकांच्या पावत्या जतन करणे आणि शक्यतो सर्व संवाद लेखी स्वरूपात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

आज महानगरांमध्ये प्रचंड सिक्युरिटी डिपॉझिटची प्रथा सामान्य झाली असली, तरी कायदा भाडेकरूंच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी स्पष्टपणे उभा आहे. योग्य माहिती, कागदपत्रांची तयारी आणि कायदेशीर जागरूकता यांच्या जोरावर भाडेकरू स्वतःचे आर्थिक हित सुरक्षित ठेवू शकतात. ◆◆◆

---

## 'टाटा मोटर्स'चा समभाग आणि ब्रोकरेज कंपन्या

टाटा मोटर्सच्या चौथ्या तिमाहीच्या निकालांनंतर शेअर बाजारात मोठी पडझड पाहायला मिळाली. या निकालांच्या पार्श्वभूमीवर मोतीलाल



ओसवाल आणि नुवामा या अग्रगण्य ब्रोकरेज संस्थांनी दिलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

मोतीलाल ओसवाल यांनी या शेअरचे 'न्यूट्रल' रेटिंग कायम ठेवले आहे. या समभागासाठीची टार्गेट प्राईस ४१४ रुपये प्रति शेअर ठेवली आहे. ब्रोकरेजच्या मते, कंपनीची कामगिरी अपेक्षेप्रमाणे असली तरी, निव्वळ नफा त्यांच्या अंदाजापेक्षा थोडा कमी राहिला आहे. देशांतर्गत व्यावसायिक वाहन (उत) उद्योगातील अनिश्चितता आणि नजीकच्या काळात मार्जिनवर येणारा दबाव लक्षात घेता त्यांनी सावध पवित्रा घेतला आहे. २०२६–२८ या कालावधीत महसूल आणि नफ्यामध्ये १० टक्क्यांपर्यंत चक्रवाढ वृद्धी होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीजने यासाठी 'बाय' रेटिंग कायम ठेवले आहे. ४८० रुपये प्रति शेअर टार्गेट प्राईस दिली आहे.

नुवामा या समभागाबाबत सकारात्मक असून त्यांनी सध्याच्या किमतीपेक्षा ४१ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे. व्यावसायिक वाहन क्षेत्रातील तेजी कायम राहील आणि टाटा मोटर्सला त्याचा मोठा फायदा होईल, असे त्यांचे मत आहे. विशेषतः इंडोनेशियाकडून मिळालेली ७०,००० वाहनांची मोठी ऑर्डर पाहता, निर्यातीमध्ये ४८ टक्के वाढ होण्याची

**■ शेअर बाजार**

शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

**प्रमुख आर्थिक ठळक बाबी**

- महसूल: २४,४५२ कोटी रुपये (२२% वाढ).
- निव्वळ नफा: २,४०६ कोटी रुपये (सुमारे ७०% वाढ).
- लाभांश: कंपनीने ४ रुपये प्रति शेअर लाभांश जाहीर केला आहे.

निकालांनंतर सुरुवातीला शेअरमध्ये ३ ते ७ टक्क्यांपर्यंत घसरण झाली होती, ज्याचे मुख्य कारण कच्च्या मालाच्या वाढत्या किमती आणि जागतिक भू–राजकीय तणावामुळे भविष्यातील मार्जिनवर होणारा संभाव्य परिणाम हे असल्याचे मानले जात आहे. ◆◆◆

---

## लाखोंची बचत असतानाही असुरक्षितता का?

आजच्या काळात लाखो रुपयांची बचत असतानाही अनेकजण भविष्यासंदर्भात अस्वस्थ आणि असुरक्षित वाटत असल्याचे दिसून येते. ही रक्कम पुरेशी ठरेल का?, अचानक संकट आले तर काय होईल? असे प्रश्न सतत मनात घोंगावत राहतात.

आर्थिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, केवळ पैसा साठवणे म्हणजे आर्थिक सुरक्षितता नव्हे. खरी सुरक्षितता योग्य आर्थिक नियोजन, जोखमीचे व्यवस्थापन आणि दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करणाऱ्या व्यवस्थेमध्ये असते. अनेकदा लोक बचत तर करतात, पण त्या बचतीचे नियोजनबद्ध रूपांतर गुंतवणूक, विमा आणि भविष्यातील सुरक्षेमध्ये करत नाहीत. त्यामुळे बँक खात्यातील आकडे वाढले, तरी मानसिक समाधान मिळत नाही.

आज सामाजिक माध्यमांच्या युगात इतरांची जीवनशैली, खर्च आणि यश सतत डोळ्यासमोर येत असल्याने स्वतःची आर्थिक स्थिती अपुरी वाटू लागते. परिणामी, प्रत्यक्षात चांगली बचत असूनही अनेकांना ती अपुरी वाटते. याखेरीज माझी गुंतवणूक महागाईवर मात करेल का?, मी खरोखर संपत्ती निर्माण करतो आहे की फक्त पैसा जमा करतो आहे? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे अनेकांकडे नसतात.



भारतीय समाजात बचतीची परंपरा खोलवर रुजलेली आहे. कठीण काळासाठी पैसे साठवून ठेवण्याची मानसिकता अजूनही मजबूत आहे. मात्र बदलत्या अर्थव्यवस्थेत केवळ पारंपरिक बचत पुरेशी राहिलेली नाही. आजची तरुण पिढी अधिक खर्चकेंद्री जीवनशैलीकडे झुकताना दिसते. 'आत्ता खरेदी करा, नंतर पैसे भरा' यांसारख्या पर्यायांमुळे बचतीचे प्रमाण कमी होत आहे. दुसरीकडे, अधिक परताव्याच्या अपेक्षेने अनेकजण थेट गुंतवणुकीकडे वळत आहेत. मात्र या प्रक्रियेत आरोग्यविमा, अपघात विमा आणि जोखमीपासून संरक्षण देणाऱ्या साधनांकडे दुर्लक्ष होत आहे.

याच ठिकाणी आर्थिक सुरक्षेचा खरा पाया कमकुवत होतो. एखाद्या कुटुंबाने अनेक वर्षांच्या शिस्तबद्ध बचतीतून मोठा निधी तयार केला असला, तरी गंभीर आजार, अपघात किंवा वैद्यकीय खर्चामुळे तो काही दिवसांत संपुष्टात येऊ शकतो. आरोग्यविमा किंवा संरक्षणात्मक आर्थिक व्यवस्था नसल्यास वर्षानुवर्षे उभी केलेली बचत एका संकटात कोसळण्याची शक्यता असते.

आर्थिक सुरक्षिततेसाठी केवळ बचत नव्हे, तर 'मनी सिस्टम' उभारणे आवश्यक मानले जाते. त्यासाठी आर्थिक नियोजन तीन स्तरांमध्ये विभागले जाते.

१) आपत्कालीन निधी आणि विमा यांसारखी संरक्षणात्मक व्यवस्था.

**■ अर्थसल्ला**

२) दीर्घकालीन वाढीसाठी केलेली गुंतवणूक.

३) भविष्यात नियमित उत्पन्नावर अवलंबून राहण्याची गरज कमी करणारी आर्थिक स्वातंत्र्याची निर्मिती.

अनेक लोक केवळ पैसा साठवतात; मात्र या वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठी स्वतंत्र नियोजन करत नाहीत. त्यामुळे बाजारातील चढउतार किंवा अचानक उद्भवलेल्या संकटांमुळे त्यांची आर्थिक घडी विस्कटते.

महागाई ही आजच्या काळातील सर्वात मोठी अदृश्य आर्थिक जोखीम मानली जाते. दरवर्षी वाढणाऱ्या महागाईमुळे पैशाची क्रयशक्ती सतत घटत असते. विशेषतः आरोग्यसेवेतील वाढते खर्च भविष्यातील सर्वात मोठे आव्हान ठरत आहेत. त्यामुळे बचत आणि विमा संरक्षण यांचा समतोल राखणे अत्यावश्यक बनले आहे.

गुंतवणूक करताना स्पष्ट ध्येय असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांचे शिक्षण, स्वतःचे घर, निवृत्ती किंवा आर्थिक स्वावलंबन यांसारखी उद्दिष्टे निश्चित केल्यास पैशाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध होते. आर्थिक सुरक्षिततेचा खरा अर्थ बँक खात्यातील रकमेपेक्षा कुठल्याही परिस्थितीत आपण आणि आपले कुटुंब सुरक्षित राहील या विश्वासात दडलेला असतो. ◆◆◆

